
पार्टनर
बिंदुमाधव खिरे

***पार्टनर - बिंदुमाधव खिरे***

*Partner - Bindumadhav Khire*

*प्रकाशक / मुद्रक*

*बिंदुमाधव खिरे*

*समपथिक ट्रस्ट*

हि संस्था समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी व द्विलिंगी समाजाच्या अधिकार व आरोग्यावर काम करते. तिची स्थापना ११ सप्टेंबर *२००२* साली झाली.

*१००४, बुधवार पेठ,*

*ऑफिस नं. ९, रामेश्वर मार्केट,*

*पुणे ४११००२*

***फोन*** *:* 9763640480 ही हेल्पलाईन फक्त सोमवारी संध्याकाळी ८ ते ९ चालू राहिल.

***E-mail*** *: khirebindu@hotmail.com*

© *बिंदुमाधव खिरे*

***प्रथम आवृत्ती*** *: नोव्हेंबर २००४*

***द्वितीय आवृत्ती*** *: नोव्हेंबर २००८ ( स्वस्त आवृत्ती )*

eBook Edition: November 2018 ( मोफत वाटपासाठी )

***मुखपृष्ठ :*** *राहुल देशपांडे*

**‘त्रिकोण’**

(LGBT Organization for South Asians )

(सॅन फ्रॅन्सिस्को, कॅलिफोर्निया)

यांस आदरपूर्वक

# मनोगत

**हे पुस्तक कशासाठी ?**

मला आठवतं तेव्हापासून माझ्या आजूबाजूला मी सतत समलिंगी द्वेष्टेपणा बघत आणि अनुभवत आलो आहे. या विषयाचे अज्ञान, गैरसमज आणि अशा व्यक्तींवर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष केला जाणारा अन्याय लोकांच्या बघण्यात, बोलण्यात, वागण्यात, विचारात, स्पर्शात सतत डोकावत असतो.

मी 'समपथिक' नावाची पुरुष लैंगिक आरोग्य संस्था चालवतोय. 'गे' सपोर्ट ग्रुप, लैंगिकतेबद्दल शिक्षण देणं, लैंगिक शिक्षण देणं, गुप्तरोग आणि एच. आय. व्ही. / एडस्ची माहिती देणं, लैंगिक आरोग्यासाठी एक हेल्पलाईन चालवणं ही संस्थेची मूळ उद्दिष्टं.

माझ्या घरचे आणि माझे बहुतेक मित्र समलैंगिकतेचा विषय सहसा काढत नाहीत. त्यांना या विषयाबद्दल ऐकायची / बोलायची इच्छा नसते. हा विषय सगळ्यांना अस्वस्थ करणारा आहे याची मला कल्पना आहे.

लोकांनमध्ये या विषयाबद्दल अज्ञान आहे. अज्ञान आहे म्हणून गैरसमज आहेत. गैरसमज आहेत म्हणून भीती आहे आणि भीती आहे म्हणून या समाजाच्या वाट्याला द्वेष आणि तुच्छता आलेली आहे.

लोकांना या विषयाची माहिती सिनेमा, नाटकं, एकमेकांना सांगितलेले विनोद, काही पुस्तकं, काही मुला-मुलींची केलेली टवाळी यातूनच मिळते. बहुतांशी ही माहिती चुकीची असते आणि या समाजावर अन्याय करणारी असते.

वर्तमानपत्रात या विषयावरचे कधी कधी लेख येतात पण कित्येक वेळा पत्रकारांनासुद्धा या विषयाची फार थोडी आणि अर्धवट माहिती असते.

अनेक डॉक्टरांना या विषयी अज्ञान असतं हा माझा स्वत:चा अनुभव आहे. त्यातले काहीजण खूप समलिंगी द्वेष्टी आहेत. या डॉक्टरांच्या विचारांवर जुन्या शिक्षणपद्धतीचा आणि सनातनी विचारसरणीचा पगडा आहे.

कायद्याने समलिंगी संभोग हा गुन्हा आहे. काही पोलीस आणि गुंड याचा वापर ब्लॅकमेलसाठी करतात.

या समाजातल्या व्यक्तींना माणूस म्हणून समजून घेण्याचा कोणीही प्रयत्न करत नाही म्हणून काही मुलं - मुली आत्महत्या करतात. या अन्यायाला आपण सर्वजण जबाबदार नाही आहोत का?

समलैंगिकतेबद्दल खरी माहिती कोण देणार? जर एखाद्या भिन्नलिंगी व्यक्तीने या विषयाबद्दल सहानुभूतीने लिहिलं तर त्याच्या लैंगिकतेवर संशय घेतला जातो. त्यामुळे अशा व्यक्तींना या विषयावर बोलायची सोय नाही. आवाज चढवणारे म्हणजे सनातनी, समलिंगी द्वेष्टे. आपल्याला त्रास होईल, मारहाण होईल या भीतीने समलिंगी लोक या विषयाची आपली बाजू मांडायचं धाडस करत नाहीत.

समलैंगिक लोकांकडे तुच्छतेने पाहिलं जातं, त्यामुळे ते उघडपणे त्यांची लैंगिकता सांगत नाहीत. म्हणून लोकांचा गैरसमज होतो, की समलैंगिकता आपल्या देशात नाही.

"मी विचार केला की मी समलिंगी आहे आणि गेली काही वर्षं या विषयात काम करतो आहे. मग आपणच या विषयावर का लिहू नये? या पुस्तकावर विचार करताना लक्षात आलं, की या विषयातले जे अनेक पैलू आहेत ते सगळेच्या सगळे मी अनुभवलेले नाहीत. मग नुसतेच माझे अनुभव सांगण्यापेक्षा माझे, माझ्या मित्रांचे अनुभव, या विषयावरचं केलेलं लिखाण, पाश्चात्त्य देशांतला दृष्टिकोन या सगळ्यांवरच लिहावं. या पुस्तकातलं रोहितचं पात्र जरी काल्पनिक असलं तरी त्याचे अनुभव खरे आहेत.

आता असा आरोप होऊ शकतो, की असं पुस्तक ऑब्जेक्टिव होऊ शकत नाही. त्यात बायस असणार. पण सनातनी लोकांचे विचार किती ऑब्जेक्टिव असतात? मी असं म्हणेन की हे आयुष्य मी जगत आलो आहे, आणि तुम्ही फक्त ही माहिती कोणाकडून सेकंड हँड तरी ऐकली आहे नाहीतर ज्या व्यक्तीला स्वत:च्या लैंगिकतेची लाज वाटते किंवा तिच्याबद्दल अज्ञान आहे अशांकडून ऐकली आहे. मी माझी बाजू मांडू इच्छितो. ती बाजू आपण निकोपपणे बघावी ही माझी इच्छा आहे.

**हे पुस्तक कोणासाठी?**

हे पुस्तक प्रत्येकासाठी आहे. आई, वडील, मुलगा, मुलगी, भाऊ, बहीण, मित्र, मैत्रीण, सून, जावई, नातेवाईक, शेजारी, सहकारी यांच्यातले कोणीही समलैंगिक असू शकतात. किंबहुना आपल्या सर्वांना एक तरी समलैंगिक भेटलेला असतोच, तो/ती समलैंगिक आहे याची आपल्याला

जाणीव नसते. कित्येक वेळा समलैंगिक लोक स्वत:च सगळ्यांत जास्त समलिंगी द्वेष्टे असतात. न्यूनगंडांनी पछाडलेली असतात. त्यांचा स्वत:बद्दल समज असतो, की आपण वाईट आहोत आणि मग हा द्वेष ते त्यांच्यासारख्या इतरांवर व्यक्त करतात.

असा/अशी कोणी समलिंगी व्यक्ती आपल्या ओळखीची असली तर (विशेषत: आपल्या जिव्हाळ्याची व्यक्ती असेल तर), 'मला माहिती नाही हेच चांगलंय अशी पळवाट घेऊन चालणार नाही. आपल्याला ती व्यक्ती सुखी व्हावी असं वाटत असेल तर या विषयाकडे डोळेझाक करता येणार नाही आणि जोपर्यंत ते समलिंगी आहेत हे सांगत नाही तोपर्यंत ही गोष्ट तुम्हाला कळणार नाही. तुम्ही म्हणाल - 'बरंय ना..... ते ना कळल्यावाचून कोणाचं काय नुकसान होणार आहे?' याच प्रश्नाचं उत्तर शोधायचा प्रयास हे या पुस्तकाचे उद्दिष्ट.

हे पुस्तक समलिंगी लोकांसाठीसुद्धा आहे. या मुला-मुलींनासुद्धा त्यांच्या नात्याबद्दल बरेच गैरसमज आहेत. कारण त्यांनी अशा प्रकारची मोकळी, सुदृढ, निरोगी नाती कुठेही पाहिलेली नसतात, त्याबद्दल चर्चा करायची, माहिती मिळवायची ठिकाणं माहीत नसतात.

या पुस्तकात फक्त समलैंगिकता हाच विषय घेतला आहे. लैंगिकतेचे अनेक पैलू आहेत, त्यांतला हा एक आहे. भिन्नलिंगी पैलू हाच एक बरोबर आहे हा अट्टहास बाळगणं किती बरोबर आहे याचा विचार आपण सर्वांनी करायला हवा. समलैंगिक लोकांचं भावविश्व कसं असतं हे दाखवण्याचा हा प्रयास आहे. या भावविश्वाला शब्दरुप देणं हे एक छोटंसं पहिलं पाऊल आहे. या पुस्तकाचा एक सेन्सिटायझेशन प्रायमर म्हणून उपयोग व्हावा, ही इच्छा. म्हणूनच मी टेक्निकॅलिटीज टाळल्या आहेत. ज्यांना या विषयाची जास्ती माहिती हवी आहे त्यांनी रेफरंसेसमध्ये

दिलेली पुस्तके जरूर वाचावीत, दिलेल्या संस्थांशी संपर्क साधावा किंवा मला लिहावे.

**भाषेबद्दल थोडेसे**

काही वाचकांना या पुस्तकातले काही शब्द अश्लील जाणवतील. मुलं, वडीलधा-या माणसांसमोर असे शब्द वापरत नसले तरी आपआपसांत असे शब्द वापरतात. ही रोहितची डायरी असल्यामुळे त्याच्या भाषेची शैली तशीच ठेवणे योग्य आहे. हे पुस्तक वाचणं क्लेशकारक असू शकते. वाचणा-यापेक्षा असं आयुष्य अशा समलिंगीद्वेष्ट्या वातावरणात जगणं हे कितीतरी पटीने जास्त क्लेशकारक आहे. काही सनसनाटी लिहून प्रसिद्धी मिळवायची ही धडपड नाही. अशा व्यक्तींचे होणारे हाल व कुचंबणा दाखविण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

**आभार**

पहिला ड्राफ्ट वाचून मला मोलाचा फीडबॅक देणारे डॉ. भूषण शुक्ला, डॉ. रमण गंगाखेडकर, मनीषा गुप्ते, जमीर कांबळे, वैभव आबनावे, केतकी रानडे यांचा मी मनापासून आभारी आहे. नयन कुलकर्णी यांनी पुस्तकाचे ड्राफ्ट अनेकवेळा वाचून त्यात बदल सुचवले. त्यांचा मी ऋणी आहे.

या पुस्तकाच्या निमित्ताने मी माझे मित्र आणि सहकारी यांचे आभार मानू इच्छितो. त्रिकोण (सॅन फ्रॅन्सिस्को, कॅलिफोर्निया), हमसफर ट्रस्ट (मुंबई), नारी (National AIDS Research Institute, Bhosari, Pune) या संस्थांचा मी ऋणी आहे. डॉ. विजय ठाकूर, सुनिता वाही, डॉ. अनंत साठे, डॉ. शांता साठे, मेघना मराठे, तेजस्वी सेवेकरी, डॉ. अवस्थी, गिरीश कोटमिरे; त्रिकोणमधले अरविंद कुमार, अशोक जेठनंदानी, संदीप रॉय

आणि हमसफर ट्रस्टचे अशोक राव कवी, विवेक आनंद, अभिजित आहेर, नितीन करानी, गिरीश कुमार यांचा मी मनापासून आभारी आहे.

या सगळ्यांशिवाय, मी जसा आहे तसा मला अनेकजणांनी स्वीकारलं, माझं माणूसपण समजून घेतलं. या सगळ्यांचे आभार मानलेले त्यांना आवडणार नाही. या सर्वांच्या ऋणात रहाणंच मला अधिक आवडेल.

या पुस्तकात मांडलेली मतं माझी आहेत. मांडलेल्या मतांशी वरील व्यक्ती/संस्था संमत असतीलच असे नाही.

- बिंदुमाधव खिरे

*चार दिवस दुकान बंद होतं. आज उघडलं. कामात बुडवून घेतो. खरा त्रास घरी आल्यावर होतो. जेवायपुरता घरच्यांशी संबंध. बेडरूमचं दार लावून घेतो. झोपायचं तरी, नाहीतर आवाज बंद करून टी.व्ही बघायचा. मधूनअधून अनावर झालं की रडायचं.*

*मित्रांपासून कॉन्टॅक्ट तोडलाय. सुट्टीची मला भीती वाटते. दिवसभर काय करायचं हेच कळत नाही. जाणवतयं, की आपण आता स्वतःला सावरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण काही करायची इच्छाच होत नाही.*

*कित्येक दिवसांत डायरी लिहिली नाही. परत लिहायला घेतली पाहिजे. शेवटपर्यंत ती एकच सोबत असणार असं दिसतंय..*

*आज हिय्या करुन ठरवलं घर आवरायचं. माळा आवरायला घेतला. अनेक महिन्यांत का वर्षांत त्याला हात लागला नव्हता.*

*मोडलेली इस्त्री, टेपरेकॉर्डर, इलेक्ट्रॉनिक की-बोर्ड.*

*सुतळीचे तुकडे. पिशव्या आणि बॅगा. कोळिष्टके आणि जळमटं.*

*जुने कपडे. इरूची एक जॉकी स्टाईल अंडरवेअर, तिला अजून त्याचा पुसटसा वास येतोय.*

*जुनी कुलुपं आणि त्यांना न लागणा-या किल्ल्या.*

*जुने अल्बम, मासिक, कॉलेजची पुस्तकं, वह्या, फाईल्स. पूर्वीपासून ठेवलेल्या डाय-या कम-जरनल्स.*

*फाटलेली, सुटी झालेली पानं. काही धूसर, काही सुरकुतलेली, काही कुजलेली. काही नव्यासारखी की जणू काही कालच पहिल्यांदा हाताळलेली.*

*अवतीभोवती हा पसारा आणि मध्ये मी.*

## शाळा

शाळा सुरू झाली. जवळपास सगळे शिक्षक वेगळे आहेत. फक्त पी.टी.चा मास्तर आणि हिंदीची बया तीच आहे. पी.टी.च्या मास्तरचे डोळे कायम लाल असतात. मागची दोन वर्षे मी पहातोय. त्याच्याजवळ आलं की दारूचा वास येतो.

आई आज गावात गेली होती. वह्या, पुस्तकं जतीनच्या दुकानातूनच आण असं बजावून सांगितल होतं. तिनं ती दुसरीकडूनच आणली. त्याच्या दुकानात महाग आहेत म्हणाली. मला आईचा कधी कधी असला राग येतो.

जतीन वर्गाचा मॉनीटर झाला. दरवर्षीप्रमाणे. सगळ्यांना तो आवडतो. मला जास्ती त्याच्याशी बोलायची संधी मिळत नाही. सगळे त्याच्या पुढे पुढे करतात. मला चान्सच मिळत नाही. त्याचा दरबार भरला नसला तर वर्गातल्या मुली काही ना काही कारण काढून त्याच्याशी सलगी करायला बघतात. या मुलींचा मला सगळ्यांत राग येतो. सारखं त्याच्याभोवती घुटमळतात. लाज नाही वाटत?

जतीनला पुस्तकं दाखवली. सांगितलं तुझ्या दुकानातून घेतली म्हणून. त्याच्या लक्षात नसलं आलं म्हणजे झालं. नाहीतर इज्जत जायची. तो गोड हसला. मोत्यासारखे दात आहेत त्याचे.

*जतीन ऑल राउंडर होता. खूप हुशार. खेळातसुद्धा निपुण. वर्गात सर्वांत छान दिसणारा. आनंदी. सदैव विस्कटलेले त्याचे रेशमी केस. उंच, गोरा, ओठांवर बारीक मिशांची लव. तंग अर्धी चडडी. मी अभ्यासात साधारण होतो, पण खेळात अगदी वाईट. मी त्याच्याशी खूप जवळीक साधायचो, पण फार संधी मिळायची नाही. मला अजूनही त्या मुलींबद्दलच्या रागाचं हसू येतं. त्या मला कॉम्पिटिशन आहेत हे मला तेव्हा जाणवत नव्हतं. मला तेव्हा सेक्शुअली काही वाटत नव्हतं. फक्त त्याच्या जवळ असावं हीच इच्छा असायची. त्याच्या नजरेत आपण चांगलं असावं, बस्स्*

माझी उंची छान वाढते आहे. मधूनअधून बाबांच्या शेजारी उभं राहून त्यांच्या नकळत आपण त्यांच्यापेक्षा किती उंच आहोत हे बघतो. काल संध्याकाळपर्यंत मी बाबांपेक्षा दोन इंच मोठा होतो. माझ्या चेह-यावरचे मुरुम माझे सर्वांत मोठे शत्रू होऊन बसले आहेत. दिवसातून पाच-सहा वेळा साबणाने तोंड धुतो.

पाऊस खूप आहे. रेनकोटातून पाणी आत शिरून मी पार भिजतो. रेनकोट भिजण्यासाठीच घालायचा असतो. पहिल्या युनिट टेस्टमध्ये गणितात नापास. हिंदीमध्ये काठावर पास. नवीन काय? मला ‘क्योंकि’, कीजिये, लीजियें पाचशेवेळा प्रत्येकी लिहायची बयाने शिक्षा केली. मला ह्स्व आणि दीर्घचं प्रकरण काय आहे हे कधीही उमगणार नाही. ज्याला पाहिजे तसं त्यानं लिहावं असं माझं स्पष्ट मत आहे. अर्थ थोडाच बदलणार आहे? प्रगतीपुस्तकावर बाबांची सही केली. त्यांना उगाच त्रास देण्यात काय अर्थ?

*आता चाळिशी जवळ आली आहे. पण मला अजूनसुद्धा हिंदीत फक्त तीनच शब्द बरोबर लिहिता येतात. क्योंकि, कीजिये आणि लीजिये.*

जतीनला जिम्नॅस्टिक्समध्ये पहिलं बक्षीस मिळालं. मी त्याला काँग्रेट्स केलं. तो हसला आणि त्यानं माझ्या खांद्यावर हात ठेवला. माझ्या अंगावर काटा आला. तो खूप छान दिसतो.

दगडूशेटची मिरवणूक बघायला मावशी आली होती. दरवर्षी येते. आज गेली एकदाची. पुण्याला नावं ठेवते. आमच्या जीवावर मजा मारते आणि जाते. टिळकांनी ही कटकट कशाला सुरू केली कोण जाणे. त्यांना बहुधा नातेवाईक नसावेत.

आज जतीनचा वाढदिवस. त्याचं नावसुद्धा किती सुंदर आहे. सगळया वह्यांवर मी ते गिरवून ठेवलं आहे. आज मी मुलींवर बारीक लक्ष ठेवून होतो. वर्गातल्या पाच मुलींनी त्याला ग्रीटींग कार्ड दिली. दोघींनी गुलाब दिले. मी सकाळी त्याला विश केलं. तो नुसता थँक्स म्हणाला. फार भाव खातो साला. मलापण त्याला गुलाब द्यायचा होता, पण कसा देणार?

***वर्गात एकूण सात मुली. जतीनबद्दल काय वाटतंय हे खरंतर तेव्हा मला कळत नव्हतं. फक्त ओढ जाणवत होती. तिचे स्वरूप कळलं नव्हतं. कोणाला हे आकर्षण कधी जाणवायला लागेल सांगता येत नाही. ब्रायनला पहिल्यांदा असलं आकर्षण पाच वर्षांचा असताना, समोरच्या गल्लीत असलेल्या एका विशीच्या मुलाबद्दल वाटलं. त्याची ओळख नव्हती. त्याचं नाव सुद्धा त्याला माहीत नव्हतं. पण बाल्कनीतून तो दररोज त्या***

***मुलाकडे बघत रहायचा. नुसता त्या मुलाकडे बघत रहावं असं त्याला वाटायचं. बाकी त्याला फारसं काही लहानपणीचं आठवत नाही, पण ही गोष्ट स्वच्छपणे आठवते आणि ह्याच्याविरुद्ध आमिशाला. तिला पहिल्यांदा एका बाईबद्दल आकर्षण जाणवलं, दोन नातवंडं झाल्यावर ५६ व्या वर्षी.***

जतीनला आज मी सिगारेट ओढताना पाहिलं. शाळेच्या जवळ एक पडकं घर आहे, त्याच्या मागे. वाईट मुलांच्या संगतीनं तो असा वागतो. मी त्याला समजून सांगणार आहे. तो माझं ऐकेल. मी त्याला बदलीन.

सिगारेटबद्दल जतीनला समजून सांगायचं धाडस मला होत नाही. त्याला माझं म्हणणं पटलं नाही तर तो माझ्यावर नाराज होईल या भीतीने मी चूप बसलोय.

आज आईने डब्यात कोबीची भाजी दिली होती. मी डबा खाल्ला नाही. बाहेर बटाटेवडा खाल्ला. घरी आल्यावर आईकडून शिव्या खाल्ल्या. जतीनला पण कोबी आणि वांगं अजिबात आवडत नाही. मी वांगं खाणं सोडून देणार आहे. .

मला पण चोरून सिगारेट ओढायची आहे, पण सिगारेट मिळवणार कशी? मला पानवाल्याकडे जायचं धाडस होत नाही. जतीनला कसं जमतं कुणास ठाऊक. बाबांना आज प्रमोशन मिळालं. आज आम्ही सगळे बाहेर जेवायला गेलो.

इंग्लिशचा मास्तर हरामी आहे. तो मुलांना कमी मार्क देतो, मुलींना जास्ती. शर्टाची बटणं उघडी ठेवतो, छातीचे केस दाखवायला. गणिताचा मास्तर त्याच्याकडे जो प्रायव्हेट शिकवणीला येतो त्यांच्याकडून अगोदर पेपर सोडवून घेतो. सायन्सचे सर आणि मराठीच्या बाई चांगल्या आहेत. उत्तेजन देतात. मारहाण करत नाहीत.

आज मी सिगारेट ओढली. किती घाणेरडी लागते. जतीन कसा ओढतो कोण जाणे. तो आज त्याच्या ग्रुपबरोबर ओढत बसला होता. म्हणाला घेणार का? मी नाही म्हणालो. त्याने आग्रह केला. त्याला नाही कसं म्हणणार? एक झुरका घेतला. ठसका लागला. सगळे हसले. म्हणाले होईल सवय हळूहळू. शक्यच नाही. या जन्मात शक्य नाही. एक अनुभव पुरे. लोक कशी काय पाकिटंच्या पाकिटं ओढतात कोण जाणे.

.....

काल आम्ही घरचे नाटकाला गेलो होतो. बालगंधर्वला. 'नटसम्राट'. डॉ. लागू. हाउसफूल्या. परत घरी येण्यापेक्षा आम्ही निलायमला कुठलातरी आर्ट पिक्चर पाहिला. थेटरमध्ये अंधार आणि पडद्यावरही अंधार. कोणी काही बोलत नाही. मला झोप आली. उगाच नाही रविवारीसुद्धा आयत्या वेळी तिकिटं मिळाली.

वर्गात सगळ्यांना सांगितलं हा पिक्चर बघू नका. टुकार आहे. असला पिक्चर मी कसा काय पाहिला म्हणून सगळ्यांनी मलाच नावं ठेवली. मला काय स्वप्न पडल होतं तो पिक्चर असा निघेल म्हणून?

आज गॅदरींग झालं. जतीननी एका नाटकात नेव्ही ऑफीसरचं काम केलं होतं. पांढरी तंग पॅट, पांढरा हाफ शर्ट आणि नेव्हीची कॅप. खूप सुंदर दिसत होता. बघत रहावं त्याच्याकडे.

*माझं नेव्ही-युनीफॉर्मसमधल्या पुरुषांबद्दलचं आकर्षण तेव्हापासून सुरू झालं असेल का?*

काल रात्री मला खूप आचरट स्वप्न पडलं. जतीन आणि मी वर्गात एकटेच. तो नेव्हीच्या युनिफॉर्ममध्ये. त्यानं मला उचलून घेतलं. मला त्याच्या मांडीवर झोपवलं. माझी चड्डी काढली. मला तेवढयात जाग आली. माझी चड्डी ओली लागत होती. मी एकदम वैतागलो. चड्डीत कशी

काय मी शू केली? दिवा लावून चड्डी बदलायला गेलो तर काहीतरी पांढरा चिकट पदार्थ दिसला. जवळचा एक रुमाल घेतला आणि पुसला. मला भीती वाटायला लागली आहे. मला काही रोगबीग तर नाही ना झाला? कसं सांगायचं घरच्यांना?

> *तरी बरं वर्गात सेक्स -एज्युकेशनचा क्लास झाला होता. पण असं काही होतं किंवा होणार हे कोणीही सांगितलं नव्हतं. आपल्या लिंगातून पांढरं काहीतरी येतंय हे घरच्यांना कसं सांगणार? मला आता हसू येतंय पण तेव्हा माझी झोप उडाली होती.*
>
> *नववीत जीवशास्त्रात एक सेक्शन होता. त्यात जननेंद्रियं व्यवस्थित धुतली पाहिजेत असं लिहिलं होतं. आम्ही मुलं हा सेक्शन बाई कधी शिकवतात याची वाट बघत होतो. आम्हाला बाईंची तारांबळ कशी उडते हे बघायचं होतं. पण बाई जास्ती हुशार. त्यांनी त्या सेक्शनचं अस्तित्वच नाकारलं आणि सरळ तो सेक्शन वगळून पुढल्या सेक्शनकडे वळल्या. त्यांना आठवण करून द्यायची कोणाची बिशाद? आम्ही खूप हिरमुसलो होतो.*
>
> *शाळेत संपूर्ण लैंगिक आणि लैंगिकतेचं शिक्षण द्यायला हवं. आता जे लैंगिक शिक्षणाच्या नावाखाली शिकवलं जातं त्याला काय अर्थ आहे? आपल्या मुलांच्या आयुष्यातला या सर्वात मोठ्या पैलूकडे आपण संपूर्णपणे दुर्लक्ष करतो. आपल्या मुलांवर अजून मोठा अन्याय तो कोणता?*

मधूनअधून माझं ‘ते’ ताठ होतंय. त्याला हात लावायची इच्छा होते. मला भीती वाटते कारण ‘ते’ कधी ताठ होईल सांगता येत नाही. परवा

जतीन समोर आला आणि .... मी शर्ट खोचणं बंद केलंय. सगळयांसमोर प्रदर्शन नको. पी. टी. मास्तर मला शर्ट खोचायला लावतो. तो निघून गेला की मी परत काढतो.

कधी एकदा रात्र होते असं होतं. मी बिछान्यात पडतो. जतीनला मनात आणला की लगेच ताठरपणा येतो. खाली उशी घेऊन मी त्यावर 'ते' घासतो. घासता घासता पांढरं पाणी येतं. मला जतीनला मनात आणून हे करायला आवडायला लागलयं.

*माझ्या नशिबानं मला स्वतःची छोटी का होईना स्वतंत्र खोली होती.*

मला रोज रात्री करायला आवडतं, पण शरमही वाटते. मी असल्या घाण गोष्टी करतो हे कोणाला कळलं तर काय म्हणतील. आईला, जतीनला किती वाईट वाटेल. तो खूप सज्जन आहे. माझ्यासारखा वाया गेलेला नाही.

*माझी इच्छा नैसर्गिक आहे आणि त्यात काहीही गैर नाही हे मला तेव्हा माहीत नव्हतं.*

बाथरूममध्ये पण मी आंघोळीच्या वेळी हाताने करायला लागलो आहे. त्यामुळे दररोज न चुकता आंघोळ करायची सवय लागली आहे. आज बाबांनी आरडाओरडा केला. खरं तर त्यांना आरडाओरडा करायला काही कारण लागत नाही. मला कामाला जायची घाई आणि हा तासन् तास बाथरूममध्ये काय करतो? आंघोळीला इतका वेळ?' मी उद्यापासून त्यांना पहिला आंघोळीचा चान्स देणार आहे. मला असं घाईघाईने उरकायची सवय नाही.

आईला हल्ली एक वाईट सवय लागलीय. दररोज सकाळी रोहित पायजमा, अंडरवेअर धुवायला टाक' म्हणून सांगते. मला असं सांगितलेलं

अजिबात आवडत नाही. मी तिच्यावर ओरडून काहीही उपयोग नाही. दररोज तेच.

मी दर शनिवारी मारुतीला जायला लागलो आहे. रूईचा हार घालतो. तेल वाहतो. म्हणतो मारुतीराया मला या वाईट गोष्टी सोडून द्यायला मदत कर, क्षमा मागतो. हे पाप माझंय, जतीनचा काहीही दोष नाही. त्याला शिक्षा देऊ नकोस. त्याची शिक्षा मला दे.

सुट्टी लागली आहे. सोसायटीची मुलं मला क्रिकेटमध्ये कायम शेवटी निवडतात. मी नेहमी पहिल्या बॉलला आऊट होतो. मला बॉलींग करता येत नाही. नुसतं फिल्डींग करावं लागतं. मला फिल्डींग करायला बोअर होतं. आज माझ्या हातून कॅच सुटला, तो बॉल माझ्याकडे मारला हे मला कळलंच नाही. मी जतीनबद्दल स्वप्नरंजन करत होतो. माझ्या टीमने मला खूप शिव्या दिल्या. बॅट्समन (शैलेश) नी हात जोडून धन्यवाद दिले. मी त्याला नो मेंशन म्हणालो तर मनिषनी (आमचा कॅप्टन) मला पाठीत गुद्दा मारला. हरामी. माझी बॅट वापरून मलाच गुद्दा. मी आता क्रिकेट खेळणारच नाही. बसू देत सगळयांना बोंबलत.

*हळूहळू माझ्यात क्रिकेटबद्दल मनस्वी चीड निर्माण झाली. ही चीड बरेच वर्षे टिकली. हल्ली मात्र मी मॅचेस बघतो. राहुल सचिन आणि जहीर आल्यापासून मला क्रिकेट खूप आवडायला लागलंय.*

काल मी मारुतीला गेलो तर माझ्यासमोर एक छान मुलगा हात जोडून उभा होता. माझ लक्ष त्याच्यावरून हटेना. तो बाजूला सरला तरी मी मान वळवून त्याच्याकडेच बघत होतो. मग तो प्रदक्षिणा घालायला गेला. मी हात जोडून घट्ट डोळे मिटले. मी भीमरूपी .... सुरु केलं. तरी तो डोळ्यासमोरून हटेना. एक सेकंद मारूती समोर येई आणि लगेचच तो

मुलगा. काळी टाइट पँट. पँटीतून दिसणारी अंडरवेअरची कड. मला लगेच ताठरपणा आला. मला लाज वाटली. आपलं हे देवळात काय चाललंय? मी वेगळ्या वेळी जायचं ठरवलं.

माझा वाढदिवस वर्गात कोणीही साजरा केला नाही. जतीनचा वाढदिवस सगळ्यांच्या लक्षात रहातो. संध्याकाळी आम्ही घरचे सगळे सिनेमाला गेलो होतो. मग जेवायला गेलो. आईबाबांनी मला टी शर्ट आणि जीन्स घेतली.

मी मारुतीला जातो आणि मग तिथेच रेंगाळत थांबतो. त्याची वाट बघतो. पण तो नंतर मला कधी दिसला नाही. तो परमेश्वर सगळं बघतोय, एक दिवस चांगला फटका देईल. मी देवाला जाणं सोडलं पाहिजे. पण इतक्यात नको. परीक्षा जवळ आलीय.

....

परीक्षा संपली. रिझल्ट लागला. माझा आठवा नंबर आला आहे. मागच्या वर्षीपेक्षा एक नंबरनी मी वर आलोय.

काल मी आणि आईबाबा नाटकाला गेलो होतो. त्यात एका बायल्या माणसाची विनोदी भूमिका आहे. त्याचं बायकी चालणं, बोलणं. हसूनहसून पुरेवाट होते. मला परत ते नाटक बघायचंय.

> *मला ते नाटक आवडलं याची आता मला लाज वाटते. दररोज अशी टवाळी माझ्या बघण्यात नाहीतर ऐकण्यात येते. एखाद्या नॉन-स्टिरीओटिपीकल मुलाची किंवा मुलीची केलेली चेष्टा, ('अरे नुसती गंमत म्हणून रे... एवढं मनावर काय ते घ्यायचं?') दुस-याची टवाळी करणं हा आमचा आवडता टाइमपास आहे. मराठीतली आणि हिंदीतली नाटकं, सिनेमे,*

*टिव्हीवरच्या सिरीअल्समधले अनेक विनोद बायकी पुरुषांवर बेतलेले असतात. ही आमची विनोदाची पातळी. ही आमची संवेदनशीलता.*

....

व्हेकेशन बॅच संपली. सुट्टीचे दिवस कसे गेले कळलं नाही. आम्ही तुळजापूर, पंढरपूरला गेलो होतो. हे दहावीचं वर्ष झालं की सुटलो. उद्या शाळा सुरु मला आज रात्री झोप लागणार नाही. मला शाळा सुरु व्हायची खूप धास्ती वाटते. दरवर्षी हेच. झोप लागू नाही म्हणून मी कितीतरी वेळ डोळे सताड उघडे ठेवून बसतो. जतीन भेटणार हा सुद्धा आनंद जाणवत नाही.

आज शाळा सुरु झाली. माझी बसायची जागा बदललीय. मी जतीनच्या पुढच्या बाकावर आलो. मला इतक्या दिवसांनी त्याला बघून किती आनंद झाला हे लिहायला शब्द नाहीत.

गणिताचा मास्तर कंडम आहे. तो मोठे बॉल असणा-या मुलींच्या गालावरून काहीतरी कारण काढून हात फिरवतो. वह्या तपासायला त्यांच्या जवळ बसतो आणि केसांवरून हात फिरवतो. गणितं चुकली की मुलींनासुद्धा मारतो. त्यांना चिमटे काढतो. मला त्याची भीती वाटते. मला त्याच्या नजरेत नजर मिळवता येत नाही. आज गणित चुकलं तर त्यानं मला मारलं. मला रडू आलं. मुलीसुद्धा रडत नाहीत. पण मला आवरलं नाही. मला लाज वाटते. मुलं आता माझी चेष्टा करतात. मला मास्तरवर रॉकेल ओतून त्याला जाळायचाय.

*का कुणास ठाऊक मला शाळेत धीटपणा आलाच नाही. फारसे मित्रही मिळाले नाहीत. खेळात चांगले नसाल तर मैत्री होऊ*

*शकत नाही की काय कोण जाणे? का आपण वेगळे आहोत हे आपल्यापेक्षा इतरांनाच अगोदर कळतं?*

आज जतीनने एक अश्लील पुस्तक आणलं होतं. त्या पडक्या घरामागे त्याचा ग्रुप जमला. त्या पुस्तकात उघडया बायकांचे फोटो होते.

*खरं तर मी त्यांच्या ग्रुपमध्ये फारसा नसायचो. त्या वेळी कसा काय होतो आठवत नाही.*

सगळी मुलं आधाशासारखी फोटो पहात होती. मला घाण वाटली. त्यांना कसं काय त्या उघड्या बाया आवडतात मला कळत नाही. मला असल्या गोष्टीत रस नाही. पण तसं बोलून दाखवलं असतं तर या पोरांनी मला फाडून खाल्लं असतं. मी पण शौकीनपणे पहाण्याचे नाटक केलं. माझ्या ढोंगीपणाचा जतीनला संशय आला असेल का? कारण त्यानं सगळ्यांसमोर मला विचारलं - 'रोहित तुझा उठतो का रे?' मी एकदम ओशाळलो. सगळे खदाखदा हसायला लागले. मी खूप शरमलो. माझा चेहरा गरम झाला होता. मी मानेनेच होकार दिला. जतीन सारखा मुलींच्या बॉल्सबद्दल बोलत असतो. तो मराठीच्या बाईंबद्दल फार घाण घाण बोलतो. त्याला त्यांच्याबरोबर सेक्स करायचाय. तो हल्ली फार बिघडला आहे. कुठल्या शहाण्या मुलाला आपल्या मराठीच्या बाईंबरोबर सेक्स करायला आवडेल? कधीकधी मी ओशाळतो म्हणून तो मुद्दामहून असं बोलतो की काय असा संशय येतो.

*आपल्याला मुलींबद्दल काहीच वाटत नाही याची खंत सुरुवातीला जाणवली नाही. त्याचा अर्थ लावता आला नाही.*

काल टीव्हीवर एक गाणं पाहिलं. त्यात मिलिंद खूप छान दिसतो. काय बॉडी आहे. जतीनपेक्षा चांगला दिसतो. दिवसभर मला मिलिंदची आठवण येत होती. तो महालात येतो. मला उचलतो. घेऊन जातो. माझं हे

असं वागणं बरोबर नाही. मी जतीनशी एकनिष्ठ रहायला पाहिजे. मला मिलिंद जास्त आवडतो हे जतीनला कळलं तर त्याला किती वाईट वाटेल.

मी आज टीव्ही मालिकेतल्या एका नटीला डोळ्यासमोर आणून हाताने करायचा प्रयत्न केला. मला घाण वाटली. मला अजिबात जमलं नाही. त्याला ताठरपणा येईनाच. मिलिंद मला उचलून घेऊन जातो अशी कल्पना मनात आणली. लगेच माझा टाइट झाला. मग त्या नटीला समोर आणलं. लगेच थंड पडलं. तरी मी करत राहिलो, फोकस करून तिला समोर ठेवायचा प्रयत्न केला. तेवढ्यात ती निसटून गेली, मिलिंद समोर आला आणि....

आज जतीन बोलता बोलता म्हणाला की हातानं केलं तर बरेच दुष्परिणाम होतात. कुठल्यातरी वर्तमानपत्रातला लेख त्याने कापून आणला होता. बस. आता मी ठरवलं मी हातानी करणार नाही. बहुधा मला गालावर मुरुम त्यानेच येत असणार.

*हस्तमैथुनामुळे काहीही दुष्परिणाम होत नाहीत हे मला खूप नंतर कळले. इतक्या लोकांना याच्याबद्दल इतके गैरसमज आहेत की विचारायची सोय नाही. या विषयावर वाटेल ते छापून येते. इलासुद्धा या बाबतीत खूप गैरसमज होते. त्याला वाटायचे की हस्तमैथुनामुळे दमा, मुरुम, थकवा, लुकडे होणं, पुरुषार्थ कमी होणे, वीर्य येणे बंद होणे या सगळ्या गोष्टी होतात. असं काहीही होत नाही. खुशाल कर, हे मी त्याला वारंवार सांगितलं पण लहानपणी शिकलेल्या गोष्टी आणि बसलेली भीती चटदिशी जाणं कठीण होऊन बसते. अजूनही त्याला हातानं करायला अपराधी वाटतं.*

अभ्यास वाढला आहे. मला डायरी दररोज लिहिता येणार नाही.

आंघोळीला आज साबण लावताना माझा टाइट झाला. पण मी काही करणार नाही हे ठरवलं आहे. लगेच बादलीभर गार पाणी अंगावर ओतलं आणि बाहेर आलो.

दुसरा दिवस- मी जतीनकडे बघणार नाही.

तिसरा दिवस - मी वर्तमानपत्र वाचणार नाही. त्यात पुरुषांच्या अंडरवेअरच्या जाहिराती असतात.

चौथा दिवस - मी मासिकं वाचणार नाही. त्यात नटांचे फोटो असतात.

पाचवा दिवस- मला सगळीकडे मिलिंदच दिसायला लागला आहे.

काल रात्री स्वप्न पडलं. मिलिंद खूप भयानक संकटात सापडला आहे. मी त्याला स्वत:चा जीव धोक्यात घालून वाचवलं. त्याला वाचवता वाचवता मी जखमी झालो. मी मरायला लागलो. त्याने मला मिठीत घेतलं. त्याच्या छातीशी घट्ट धरलं. त्याच्या डोळ्यांत पाणी आलं. रात्री चड्डी बदलणं ही एक कटकट आहे.

*माझी प्रतिज्ञा त्याच दिवशी संपुष्टात आली. कायमची.*

परीक्षा जवळ आली आहे. मी किमान ८० टक्के मार्क काढावेत अशी बाबांची इच्छा आहे. कधीची एकदा परीक्षा होते असं झालंय. आता मी इतक्यात डायरी लिहिणार नाही.

*ते वर्ष कसं गेलं कळलं नाही. सकाळी क्लास, दुपारी शाळा, घरी आलं की अभ्यास आणि रात्री मिलिंद,*

सुट्टी लागली. मी मागच्या महिन्यात पेटीचा क्लास लावला. तिथे एक मुलगी पेटी छान वाजवते. तिचा दुर्गा राग ऐकत रहावा. मला राग कधी शिकवणार कोण जाणे. नुसतं सा-रे-ग-म वाजवायला बोअर होतंय.

मागच्या आठवड्यात आम्ही सगळे गणपतीपुळ्याला गेलो होतो. आईने माझा रिझल्ट चांगला लागावा म्हणून नवस केला. मला काळजी पडलीय की याच्या पुढे मला जतीन भेटणार नाही.

*मला वाटतं आईने मला परीक्षेत चांगले मार्क मिळावेत म्हणून जवळपास सगळ्या दैवतांना नवस केला होता. बाबांचा अशा गोष्टींवर विश्वास नव्हता.*

मला ८२ टक्के मार्क पडले. सायन्सला अॅडमिशन घेतली. फर्गुसन कॉलेज, जतीन पण माझ्याच वर्गात आहे. त्याला ८४ टक्के मार्क पडले. आम्ही परत एकत्र आलोत. माझे हात स्वर्गाला टेकलेत. आईने मला सोन्याची चेन केली आहे. बाबांनी मला इलेक्ट्रॉनिक की बोर्ड घेतला.

उद्या कॉलेज सुरु होणार. आज पहाटे मला मी डॉक्टर झालोय असं स्वप्न पडलं. पहाटेची स्वप्नं खरी होतात.

*****

# कॉलेज

कॉलेज सुरू झालं. मला आता ख-याअर्थी एकटं एकटं वाटायला लागलंय. ओळखी ब-याच मुलांशी झाल्या आहेत, पण अजून कुणाशी जवळची मैत्री नाही. माझ्या शाळेतल्या वर्गातला फक्त जतीनच. त्याच्याशीसुद्धा फक्त येताजाता हायबाय करण्यापुरताच संबंध येतो. कधी कधी वैशालीत (*रेस्टॉरंट*) भेटतो. मी त्याच्याबरोबर रहायचा प्रयत्न करतो. पण तो आता बदललाय. माझ्याशी जास्त  जा काही बोलत नाही. मला वाईट वाटतंय. मी काही त्याला कमी जास्त बोललो तर नाही? पण तसं मला काही आठवत नाही. त्यातल्या त्यात जॉन आणि रवी माझे जवळचे मित्र आहेत.

वर्गात एक बायकी मुलगा आहे. त्याच्याजवळ आम्ही कोणीही बसत नाही. त्याच्या बाकावर तो एकटाच असतो. एकदा तो माझ्या शेजारी येऊन बसला. मला खूप अस्वस्थ व्हायला झालं. मी उठून दुसरीकडे जाऊन बसलो. उगाच कोणाचे माझ्याबद्दल गैरसमज व्हायला नकोत.

*हे गैरसमज काय होणार होते याबद्दल खरं तर मला तेव्हा विचारलं असतं तर सांगता आलं नसतं. त्याच्याबरोबर माझी टवाळी व्हायला नको ही भीती होती आणि चारचौघांपेक्षा वेगळ्या असणा-या व्यक्तींबद्दल जो 'फोबीया सगळ्यांच्या मनात असतो तो माझ्या मनातही होता. तो फोबीया खूप नंतर गेला.*

मला प्रकर्षाने जाणवायला लागले आहे, की मी वेगळा आहे. मला फक्त मुलं आवडतात. त्यांचा सहवास आवडतो. माझी एकही मैत्रीण नाही. त्यांच्याशी मैत्री करायची इच्छाच होत नाही..

इंग्लिशच्या मॅडम आणि फिजीक्सचे सर चांगले आहेत. स्वभावानेही चांगले आहेत. मला मदत करतात. फिजीक्सचे सर दिसायलाही छान आहेत. माझ्या मनात आज विचार आला, की मला सरांशी लग्न करायला आवडेल.

*आत्ता परवाच दिसले होते रस्त्यात. वाटलं होतं ओळख द्यावी. पण का कोणास ठाऊक नाही दिली. काय बोलणार? काय सांगणार? त्यांना मी आठवत तरी असेल का?*

त्या मुलाचे नाव काय आहे मला माहिती नाही. त्याला सगळे 'अगं' म्हणूनच संबोधतात. त्याच्या बायकी हावभावामुळे मला त्याची भीती वाटते. त्याच्याबद्दल घृणा वाटते. मुलं त्याची चेष्टा करतात. त्यात जतीनचा पुढाकार असतो. त्याचा एक घोळका आहे. त्यात चार मुलं आणि दोन मुली आहेत. दोघीतली एक नेहा म्हणून आहे. ती आणि जतीन सारखे बरोबर असतात. मला त्यांचा मत्सर वाटतो आणि द्वेषपण वाटतो. या घोळक्यातले त्या 'अगंला खूप त्रास देतात. कधीकधी मागच्या बाकावरून त्याला कागदाचे बोळे मारतात. कधी मागून टपला मारतात. त्यानं मागे वळून पाहिलं तर सगळे चूप बसतात. त्याला काहीही करता येत नाही. आता तो शेवटच्या बाकावर बसतो.

मला हळूहळू त्याची कीव यायला लागली आहे. त्यानं काय केलंय? कोणाच्या अध्यात ना मध्यात. आज मी जतीनला भीत भीत तसं सांगायचा प्रयत्न केला. 'जाऊ दे रे जतीन .... कशाला त्याला त्रास द्यायचा तर त्यानं उलट मलाच विचारलं 'तुला का त्याचा पुळका? तू पण तसाच हिजडा आहेस का? मला तुझ्याबद्दल पण कधी कधी शंका येते. मी घाबरलो. कसली शंका येते त्याला? की मी हिजडा आहे म्हणून? त्यांच्या खाली काही नसतं असं जॉन म्हणतो. म्हणजे त्या अगंच्या खाली काही

नाही का? मी नक्कीच असा नाही. मला तर खाली सगळं आहे. मी खूप गोंधळलो आहे. पण कोणाला विचारणार?

> *त्या मुलाचं नाव काय आहे मला शेवटपर्यंत कळलं नाही. हिजडा म्हणजे काय हे मला माहीत नव्हतं, पण या रस्त्यावरच्या साडी घातलेल्या पुरुषांशी माझं हा नातं जोडतोय या भीतीने मी बेचैन झालो होतो. मला एकदम असुरक्षित वाटायला लागलं होतं. आता विचार केला की कळतं की जतीनला 'हिजडा' या शब्दाचा अर्थ कदाचित माहीत नसावा. तो नॉन-स्टिरीओटिपीकल मुलांना (म्हणजे मुख्यतः बायकी मुलांना) 'हिजडा' म्हणून चिडवायचा. मी त्याला समज द्यायचा प्रयत्न केला तर ते शस्त्र त्याने माझ्यावर उगारलं. अशा ब्रह्मास्त्राचा प्रतिकार करणं मला शक्य झालं नाही. जॉनलाही काहीही हिजड्यांबद्दल माहिती नव्हती. मला बरोबर माहिती खूप नंतर कळली.*
>
> *आता दोन हिजडे माझे चांगले मित्र आहेत. माझ्यासाठी हिजडा आता शिवी नाही. पण ही जाण यायला समोरच्या माणसाशी माणूस म्हणून संवाद साधायची तयारी हवी. ही तयारी जोवर माझ्यात नव्हती तोवर मी हा फोबीया घालवू शकलो नाही.*

वर्गात बसायची इच्छाच होत नाही. बाहेर फिरायची सवय वाढली आहे. बहुतेक वेळ मी जॉन आणि रवीबरोबर असतो. घरी फक्त जेवायला आणि झोपायला.

आमचा अड्डा कधी वैशालीत ( *रेस्टॉरंट* ) कधी रूपालीत *(रेस्टॉरंट),* कधी टेकडीवर तर कधी कॅन्टीनमध्ये जमतो. बंक मारून पिक्चरला जाणं, बाहेर खाणं तर नियम झालाय. आई सारखी 'सांगून तरी बाहेर खात जा

म्हणजे अन्न वाया जाणार नाही म्हणून भुणभूण लावते. असं ठरवून बाहेर खाणं होतं का कधी? तिला काही कळत नाही.

आज जतीन मला काय तुझा होमो मित्र काय म्हणतो' असं म्हणाला. मला हल्ली त्याच्या समोर जायचीसुद्धा भीती वाटते. होमो म्हणजे काय हे मला माहीत नाही पण बहुतेक काहीतरी शिवी असणार. मी घरी आल्यावर ऑक्सफोर्ड इंग्रजी - मराठी डिक्शनरी उघडून 'होमो'चा अर्थ शोधला. 'होमो' असा शब्द नव्हता पण 'होमोजीनाईज्ड' आणि 'होमोनीम' खाली मला एक शब्द मिळाला 'होमासेक्शुअल' समलिंगी व्यक्तीचे आकर्षण असणारा माणूस / समलिंगी संभोगाची आवड असणारा. हे वर्णन माझं आहे हे जाणून माझ्या छातीत धस्स झालं. मला आज रात्री जेवण गेलं नाही.

*मला काही सुचत नव्हतं. मी इतरांसारखा नाही आणि जतीन ज्या अर्थी ही शिवी म्हणून वापरतोय त्या अर्थी मी वाईट असलो पाहिजे. मी विकृत आहे असं वाटायला लागलं. वाटायचं की हे कुठलं पाप माझ्या वाट्याला आलंय? मी असा का? जगात मीच एकटा असा आहे का? इतर जणं माझ्यासारखे असतील तर कुठे आहेत ते? कुणाशी बोलू? कोण मला अचूक माहिती देईल? कोण माझा तिटकारा करणार नाही?*

काल अत्रे सभागृहात एका पुस्तकाच्या प्रदर्शनाला गेलो होतो. तिथे एक सेक्स एज्युकेशनचं पुस्तक होतं. ते पुस्तक एका इंडियन डॉक्टरांनी लिहिलं होतं. मी कोणाचं लक्ष जाणार नाही असं पाहून हळूच शेवटच्या पानावर इन्डेक्समध्ये होमो शब्द शोधला. ते पान वाचून काढले.

यात समलैंगिकता ही विकृती आहे असं लिहिलं होतं. त्यात सल्ला दिला होता, की मुलांचे विचार मनात आले की लगेच थांबवायचे. ही प्रवृत्ती

बदलायची असेल तर आपण आरशासमोर उभं राहून मी असे वाईट विचार मनात आणणार नाही अस दररोज म्हणायचं असं लिहिलं होतं. माझ्या छातीत एकदम एक कळ येऊन गेली. .

*या असल्या सल्ल्याचा मला खूप त्रास झाला. त्याचा काहीही उपयोग झाला नाही.*

मी विकृत आहे. मला आईबाबांनी एवढ्या प्रेमानी वाढवलं. त्यांनी माझ्यासाठी किती त्रास सोसला आणि मी अशी परतफेड करतो आहे. मी आज देवासमोर हात जोडले. म्हणलं की काही कर पण मला बरं कर. मला नाही सहन होत. अजूनही मी जतीनला किंवा मिलिंदला समोर आणून हाताने करतो. नंतर माझी मला घृणा वाटते. जतीनला कळलं तर? त्याच्या नजरेतून मी पार उतरेन. आईला कळलं तर? तिला किती वाईट वाटेल. मी जगण्याच्या लायकीचा नाही. कोणीही माझ्यावर प्रेम करणार नाही. मला मरून जावंसं वाटतंय. झोपेच्या गोळ्या खाऊन मरावं म्हणजे सर्वांचाच त्रास संपेल.

*मला त्या वेळी पहिल्यांदा आत्महत्येचा विचार मनात आला. मला पुरुषावर प्रेम करण्याचा त्रास तो पर्यंत कधीही झाला नव्हता. पण जतीनच्या बोलण्याने मला एकदम दाखवून दिलं की माझीही भावना अमान्य आहे, तिरस्करणीय आहे. माझा सगळा आत्मसन्मान एका क्षणात गळून गेला.*

जतीन मला आता काय म्हणतोय तुझा ‘होमो मित्र' अस आवर्जून विचारतो कारण लगेच त्याला माझ्या डोळ्यांत भीती दिसते.

*काहीजणांचा, दुस-याला असुरक्षित करून स्वतः सुरक्षित आहोत हे भासवणं, सर्वांत मोठा गुण असतो. ही गोष्ट मी आजवर नियमितपणे वेगवेगळ्या पैलूत बघत आलोय. वाटायचं, की वय*

*वाढलं की ही असुरक्षितता कमी होत असेल. पण तसं नसतं. काहीजणांचं संपूर्ण आयुष्य दुस-याच्या असुरक्षिततेवर आधारलेलं असंत Like a parasite, they feed on someone's insecurity.*

आता नेहमीसारखा मी मित्रांच्यात रमत नाही. आपण वेगळे आहोत, परके आहोत हा भुंगा माझ्या मनात सतत असतो.

....

माझं अभ्यासातून लक्ष उडालंय. इंग्लिश, मराठी आणि फिजीक्समध्ये मला बरे मार्क आहेत. बाकीच्या सगळ्या विषयांत मी जेमतेम पास आहे. मला त्याचं काहीही नाही. घरच्यांना कळत नाही की काय झालंय. बाबा खूप ओरडले. आईपण नाखूश आहे. त्यांनी कारणं विचारली. वाईट संगत लागली का? बाहेर कुठला नाद लागला का? जुगार? दारू? प्रायव्हेट क्लासमध्ये चांगलं शिकवत नाहीत का? मी एक नाही की दोन नाही. काय सांगणार? आणि कसं सांगणार? मला आता काही करावसंच वाटत नाही. काही आत्मकांक्षाच उरली नाही. काय उपयोग आहे शिकून? कशासाठी शिकायचं? कशासाठी जगायचं?

मी दररोज सकाळी आरशासमोर उभा राहून मी वाईट वाईट विचार मनात आणणार नाही असं मोठ-मोठ्यानं म्हणतो. मुलींचा विचार मनात आणतो. मुलांबद्दल विचार करत नाही. पुरुषांच्या अंडरवेअरच्या जाहिराती मी बघत नाही.

सिनेमाला जाणं मी बंद केलंय. अभ्यासात लक्ष घालायचा प्रयत्न करतोय. बघू काय होतंय ते.

*व्हायचं तेच झालं. काहीही उपयोग झाला नाही.*

परीक्षा झाली. काठावर जरी पास झालो तरी बरं होईल. वर्ष तरी वाया जाणार नाही. मी आज बी. सी. एल. (ब्रिटिश काउनसील लायब्ररी) लावली, दिवसभर तिथेच होतो. मेडीकल, सायकियाट्रीच्या सेक्शनमधली पुस्तकं चाळली. कोणी जवळपास नाही हे बघून होमोसेक्शुॲलीटी वरचे सेक्शन्स वाचून काढले. पुस्तकांत ही डिसऑर्डर म्हणून लिहिली आहे. कशी काय माझी भावना डिसऑर्डर असू शकते? एवढं शुद्ध प्रेम मी करतोय आणि ते विकृत कसं काय? पण ज्या अर्थी हे म्हणतायत त्या अर्थी ते खरं असलं पाहिजे.

*खूप नंतर कळलं, की सायकियाट्रीमध्ये पूर्वी समलिंगी असण्याला डिसऑर्डर म्हणत असत आणि तो विचार आता बदललाय. ए. पी. ए. - अमेरिकन सायकियाट्रीक असोसियअेशननी हा आजार नाही हे मान्य केलं आणि त्यांच्या डिसऑर्डर्सच्या यादीतून नाव काढून टाकलं.*

*"Homosexuality per se implies no impairment in judgment, stability, realibility or general social or vocational capabilities, therefore, it be resolved that the - American Psychiatric Association deplores all public and private discrimination against homosexuals in such areas as employment, housing, public accommodation and licensing and declares that no burden of proof of such judgement, capacity, or reliablity shall be placed on homosexuals greater than that imposed on any other persons..." पण तो पाश्चात्त्य देशांतला विचार अजूनही आपल्याकडे बहुतेक ठिकाणी पोहोचलेला नाही किंवा शक्यता आहे, की विचार पोहोचलाही असेल पण त्यावर नॉन-जजमेंटल आणि नॉन-डिस्क्रीमिनेटरी विचार करायची शिकवण येथे नाही. आपल्या*

*इथले अनेक डॉक्टर समलैंगिकतेला अजूनही आजार मानतात. ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.*

मी पास झालो. आम्ही तुळजापूर आणि गाणगापूरला जाऊन आलो.

कॉलेज उद्या सुरू होणार. माझ्या छातीत धडधडतंय. पायांत काही ताकद  नाही असं वाटतं, कधी एकदा जतीनला पहातोय असं झालंय. मला माझी  'घृणा’ वाटते.

आज कॉलेज सुरू झालं. दोन महिने मी जतीनला पाहिलं नव्हतं. मी खूप उतावीळ झालो होतो. पण माझ्या पदरी निराशा आली. तो नेहाबरोबर आला. मी त्याच्या समोर जाऊन त्याला हाय केलं तर म्हणाला, “काय म्हणतोय तुझा होमो मित्र'. नेहा खोखो हसायला लागली. ही साली सारखी त्याच्या अवतीभोवती  असते. मला सगळं संपवावंसं वाटतंय,

*त्या काळी इंटरनेट नव्हतं. मोबाईल नव्हते. सुट्टी लागली की परत भेट दुसरं वर्ष सुरू झाल्यावर. मला अजूनही तो दिवस आठवतोय. त्या दिवशी मी घरी आल्यावर खूप रडलो. त्याला माझ्याबद्दल काहीही वाटत नाही हे एक दुःख. आपण ज्याच्यावर प्रेम करतो तो आपली ही विकृती मानतो हे दुसरं दुःख. त्याला, आपण त्याच्यावर किती मनापासून प्रेम करतोय हे सांगूही शकत नाही हे तिसरं दुःख. त्या रात्री परत एकदा माझ्या मनात आत्महत्येचा विचार आला.*

क्लास सुरू झालेत. हे बारावीचं वर्ष पण माझं लक्ष नाही. कुठल्या डॉक्टरांकडे जावं का? पण काय सांगणार? एका ति-हाइताला माझ्या मनात  होमो भावना आहेत हे सांगणं मला शक्य होणार नाही. काय करायचं सुचत नाही. उजेडसुद्धा नकोसा वाटतो. बेडरूमचं दार लावतो. पडदे लावून घेतो. अंधार करतो आणि नुसता पडून रहातो. आई -

बाबांना वाटतं की मी बेडरूममध्ये अभ्यास करतो. सेमिस्टर तोंडावर आली आहे. मला काहीही येत नाही. जाऊ दे, जे व्हायचं ते होईल.

*ही आणि याच्या पुढची दोन - तीन वर्षं माझ्या आयुष्यातली सगळ्यांत वाईट वर्षं निघाली. हे वाचतानादेखील माझ्या अंगावर काटा आलाय.*

आज एक भयंकर प्रकार घडला. आम्ही लॉ कॉलेजच्या मागच्या टेकडीवर फिरायला गेलो होतो. जतीनचा ग्रुप आमच्या पुढे होता. "अग' टेकडीवर एका दगडावर बसून काहीतरी लिहीत होता. जतीननी त्याला हटकलं. काहीही कारण नसताना. त्याच्या हातून वही हिसकावून घेतली. वाचायला लागला. कुठली तरी कविता होती. त्याला तो चिडवायला लागला. 'कविता करतेस का गं अगं?, पोरगा आहेस पोरगी?' इतर जण हसत होते. आमचा ग्रुप तिथेच थांबला. तो वही मागायला लागला. जतीन म्हणाला 'देतो, पण अगोदर सांग तू मुलगा आहेस का मुलगी. तो ओशाळला. तर श्रीपाल म्हणाला "का गं सांगता येत नाही?' सगळे हसायला लागले. मला सणसणून घाम सुटला. माझे पाय कापायला लागले. जतीन म्हणाला "ठीक आहे मग आपणच तपासून पाहू. धरा रे त्याला', नेहा, श्रीपाल, सत्यजितने त्याला धरलं. तो घाबरला होता. रडायला लागला. 'सोडा मला' म्हणून विनवायला लागला. जतीननी त्याच्या पँटची चेन काढली आणि पँट खाली ओढली. तो झटापट करत होता. जतीननी त्याच्या एक मुस्काटात ठेवून दिली आणि त्याची अंडरवेअर खाली ओढली. जतीन लाडात बोलायला लागला, 'आलेले बालाला काय झालं? छोटासा काजू आहे तल... मग मुलगीसारखं काय वागायचं ते? आणि पोरगी व्हायच असेल तर मग शहाण्या मुलीसारखं माझ्या खालून जायचं बरं का... होमो साला'. मला मध्यस्थी करायची होती पण त्या पोराची बाजू

घ्यायला माझ्यात दम नव्हता. माझी चड्डी काढली तर? मला खूप भीती वाटत होती. मी, जॉन, रवी लगेच घरी गेलो. उगाच आमचं नाव यात कुठे गुंतायला नको. मला माझी, जतीन, नेहा, श्रीपाल, सत्यजीत, जॉन, रवी या सगळ्यांची लाज वाटतीय.

*तो प्रसंग अजूनही माझ्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा आहे. मी काहीही करायचा प्रयत्नसुद्धा केला नाही. नुसता चूप बसलो. जतीननी आणि त्याच्या मित्रांनी काय पुरुषार्थ दाखवला कुणास ठाऊक. तो 'गे' होता का? माहीत नाही.*

*अशा बायकी मुलांना खूप त्रास होतो. पुरूषासारखं वाग म्हणून घरच्यांकडून, मित्रांकडून दडपण असतं. कोणीही त्यांच्या बाजूने बोलत नाही. त्यांच्या बायकीपणासाठी त्यांना मार खावा लागतो, टवाळी सहन करावी लागते. आम्हां सगळ्यांना कस्टम मेड मुलं हवी आहेत. नॉनस्टीरिओटिपीकल मुलं नको आहेत. दोष मुलांचा नाही. आपला आहे.*

*आम्हाला एक इंटरसेक्स मूल जन्माला आलं तर आम्ही ते लगेच अनाथ आश्रमात देऊन टाकणार, जर सेक्शुअल ओरीयंटेशनची गर्भ राहिल्यावर टेस्ट असती तर आम्ही समलिंगी मुलांचा गर्भपात केला असता.' ही असली उत्तरं मला अगणित वेळा लैंगितेच्या वर्कशॉपमध्ये ऐकायला मिळालेली आहेत. मला कधी कधी प्रश्न पडतो, की आमची पालक व्हायची लायकी आहे का?*

मला माझा तिटकारा वाटतो. पण आता मला जतीन आणि इतर मुलांचाही तिटकारा वाटायला लागलाय. माझ्या मनात फक्त द्वेषाची भावना आहे. स्वत:बद्दल आणि इतरांबद्दल. मी आणि इतरजण

बघत राहिलो. आम्ही एकहीजण त्या मुलाच्या मदतीला का जाऊ शकलो नाही? हे पुरुष कसले? मग माझ्यासारखा 'होमो' काय वाईट आहे? निदान मी दुस-याला त्रास तर देत नाही ना? मला आता जतीनकडे पहावत नाही. मला प्रिन्सिपलना निनावी पत्र पाठवावंसं वाटतंय. पण तो अत्यंत कंडम माणूस आहे. काही उपयोग होणार नाही...

*तो मुलगा परत कॉलेजला आला नाही. मला भीती वाटत होती की त्याने कंप्लेंट केली तर? पण तो काय कंप्लेंट करणार, उद्या जतीन म्हणाला की त्यानेच जतीनला नको तिथे हात लावला, तर? ही मुलं जतीनचीच बाजू घेणार आणि नंतर? जतीन त्याला एकट गाठून काय करेल? या प्रसंगानंतर मी जास्तीच निराश झालो. एखादा सुंदर निरागस दिसणारा मुलगा इतका वाईट असू शकतो याच्यावर माझा विश्वास बसत नव्हता. ही वस्तुस्थिती स्वीकारायला जड जात होती. त्याचे रंग अगोदरच दिसायला लागले होते. पण माझे प्रेम आंधळं होतं. मी मुलगी असतो तर? जतीनला मी आवडलो असतो तर? मी त्याच्या बरोबर लैंगिक संबंध ठेवले असते का? तो म्हणाला असता, की पळून जाऊन लग्न करू, तर केलं असतं का? हो. आणि मग? मग जाग आली असती. पण खूप उशीर झाला असता. आपण फक्त शरीरावर किती भाळू शकतो आणि वाहून जातो.*

मला खूप त्रास होतोय. एका बाजूला मला जतीनबद्दल द्वेष वाटतोय. पण दुस-याच बाजूला त्याच्याबद्दल माझ्या लैंगिक भावना जास्ती वाढल्या आहेत. जतीनने जबरदस्तीने त्या मुलाची चड्डी काढली तशी माझी काढावी असे विचार माझ्या मनात येतात. त्याने माझ्यावर

थुंकावं, जबरदस्तीने मला नागडं करून बेदम मारावं आणि माझ्यावर बलात्कार करावा असं सारखं मनात येतं आणि ताठरपणा येतो.

मी हल्ली सारखा आजारी पडायला लागलो आहे. दर तीन चार आठवड्यांनी आजारी पडतो. माझं वजन खूप उतरलंय. मला डायरी लिहायची इच्छा होत नाही.

आज परत डायरी लिहायला घेतली. तिच्याशिवाय बोलायला दुसरं कोण आहे? परीक्षा झाली. गणिताचा पेपर कोरा सोडून आलो. बाहेर वेळ काढला आणि घरी आलो. घरच्यांना मी मेडिकलला अॅडमिशन घ्यावी अशी इच्छा आहे.

आज एक अकरावीतला मुलगा मला भेटला. त्याचं नाव अनिकेत आहे. असं निदान तो सांगतो आहे. तो माझ्याकडे रूपालीत सारखा बघत होता. सुरुवातीला मी दुर्लक्ष केलं. मला मुलांकडे डोळ्यात डोळे घालून बघायची भीती वाटते, पण मग धीर करून चोरट्या नजरेने पाहिलं. त्यानं स्मित केलं आणि मान डोलावली. मी मित्रांबरोबर बाहेर पडलो आणि मागे रेंगाळलो. तो माझ्या मागे आला, मी बी. सी. एल. च्या समोरच्या बाकावर बसलो. तो शेजारी बसला. म्हणाला “तुझा शर्ट छान आहे. मी लाजून त्याला ‘थँक्यू' म्हणालो. वळून पहिल्यांदा त्याला पाहिलं. तो दिसायला साधारणच होता. तो म्हणाला, ‘एफ. सी. ला आहेस ना बारावीला? .... मी अकरावीला आहे.'

तो आणि मी हल्ली बरोबर असतो. जेवायला, सिनेमाला एकत्र जातो. मला त्याच्याशी भावनिक जवळीक साधायचीय पण तो अलिप्त असतो. जास्ती गलत नाही. भावनिकदृष्ट्या त्याला माझ्यात इंटरेस्ट नाही. जणू काही त्याला काही भावनाच नाहीत. त्याला माझ्याबरोबर सेक्स करायचाय.

आज तो मला एका अर्धवट बांधकाम सोडून दिलेल्या कंस्ट्रक्शन साईटवर घेऊन गेला. आम्ही सातव्या मजल्यावर गच्चीवर गेलो. टाकीखाली बसलो. मला कोणी येईल की काय याची भीती वाटत होती....

नंतर आम्ही एकमेकांचा फोन नंबर घेतला. मला त्याला फोन नंबर द्यायची भीती वाटली पण तो हातून निसटून जायला नको म्हणून मी दिला.

मी अनिकेतला हल्ली वारंवार भेटतो. पण माझी भावनिक भूक भागत नाही. माझ मन पूर्ण रितं असतं. मला त्याच्या मिठीत जावंसं वाटतं, त्याच्या केसातून हात फिरवावासा वाटतो. पण तो एका दगडासारखा आहे. त्याला भावना नाहीत की त्या व्यक्त करायची भीती वाटते? त्याला माझ्यात गुंतायची भीती का वाटते? मी त्याला खूप बोलता करायचा प्रयत्न करतो पण तो जास्ती बोलत नाही. कामापुरता मामा. मला जाणवतंय की त्याला त्याच्या लैंगिकतेची लाज आहे. अपराधीपणाची भावना आहे. स्वत:बद्दल द्वेष आहे. त्याला इच्छा झाली की तो मला फोन करतो. कुठंतरी घेऊन जातो....

मी फोन केला तर तो येत नाही. काहीतरी कारण काढतो. त्याची इच्छा असली तरच आम्ही भेटतो. मला माझा वापर केला जातोय असं वाटायला लागलंय. मी आज त्याला तसं बोलून दाखवलं. तो म्हणाला 'मी काही जबरदस्ती केलेली नाही. चिडून निघून गेला. मला रडू आलं. माझं काय चुकतंय हेच कळत नाही.

*मी होतो त्याहीपेक्षा जास्ती डिप्रेशनमध्ये गेलो.*

मी त्याला परत परत फोन करतो. तो फोन ठेवून देतो. आज मी त्याला वैशालीत भेटायचा प्रयत्न केला. तो त्याच्या मित्रांबरोबर होता. काहीही बोलता आलं नाही. मी त्याला सांगितलं, की 'मला तुझ्याशी बोलायचंय'.

तो म्हणाला, ‘बोल ना इथंच.' काय बोलणार? मला तो हवा आहे. हे त्याला माहिती आहे. तो मला मुद्दामहून छळतो. निष्ठूर आहे भडवा.

परवा माझ्यामावस भावाचं लग्न आहे. नातेवाईकांच्या लग्नकार्यात मला काहीही रस नाही. लग्नाच्या निमित्ताने बाहेरगावचे पाहुणे येणार आहेत. कार्यालयात रहायला जागा नाही म्हणून काहीजण आमच्या घरी उतरणार आहेत. पाहुणे येणार म्हणून आधी आठवडाभर आई घर आवरत होती. मी नसताना मला न सांगता माझी खोली आवरली. मी तिला खूप ओरडलो. काही उपयोग नाही. घरच्यांना प्रायव्हसी कळतच नाही.

आज पाहुणे गेले. सुटलो. त्यात एकीचं माझ्याकडे सारखं लक्ष होतं. मागचे चार दिवस सारखी माझ्याशी सलगी करायला बघायची. कुठे पेढाच आणून दे, कुठे हाताची मेहंदी दाखव, कुठे माझ्या कपड्यांची इस्त्री कर. काहीतरी या बयाचं चालूच. माझ्याबरोबर एक फोटोसुद्धा काढून घेतला. कधी एकदाची ही कटकट जातीय असं झालं होतं.

*मी किती इनसेन्सिटिव्ह होतो.*

नातेवाईक आठवडाभर राहिले. मी एखादाच शब्द बोलत होतो. अगदी नाईलाज होईल तेवढाच. आई मला सारखं हळूहळू सांगत होती की ‘जरा बोल त्यांच्याशी. असं काय वागतोस?' म्हटलं ‘उतरायचं होतं त्यांनी हॉटेलमध्ये.आले कशाला घरी?' ते गेल्यावर खूप भांडणं झाली. मी आई - बाबांना शिव्या दिल्या. बाबांनी मला मारलं. साला. मला छान वाटतंय, की माझ्यासारखा मुलगा त्यांच्या नशिबी आला, हीच त्यांची लायकी.

रिझल्ट लागला. घरच्यांना मोठा धक्का बसलाय. बाबांनी मला मारलं. हल्ली ते रोजचंच झालंय. मी कोडग्यासारखा चूप बसलो. मला आता रडूसुद्धा येत नाही. आईला खूप त्रास होतो. तिला मी असं का वागतो कळत नाही आणि मला सांगता येत नाही. आज संध्याकाळी गच्चीवर

गेलो. चवथा मजला. टाकीवर उभा राहिलो. खाली वाकून पाहिलं. पाच-दहा सेकंदांत सगळं संपून जाईल. दोन-चार सेकंद खाली पडायला आणि एक-दोन सेकंद असह्य वेदना. मग अंधार. लोकांना वाटेल, की मी परीक्षेत नापास झालो म्हणून जीव दिला. मी एक पाऊल पुढे टाकलं. काठावर उभा राहिलो. खाली बघून मला भोवळ यायला लागली. पाय कापायला लागले. उडी टाकायचा धीर होईना. एक पाऊल मागे टाकलं आणि मटकन खाली बसलो. मला जीव द्यायची पण हिंमत नाही. शी. कसलं हे घाणेरडं जगणं.

> *आज मला धन्य वाटतंय की मी आत्महत्या केली नाही. पण त्या वेळी मी खूप त्याच्या जवळ गेलो होतो. कशासाठी जगायचं हेच कळत नव्हतं. एखाद्या व्यक्तीला आपल्या लैंगिकतेसाठी जीव द्यायची पाळी यावी ही स्थिती कुठलाही समाज कसा काय सहन करु शकतो? माझ्यासारख्या किती मुला/मुलींनी आत्महत्या केल्या असतील? (काहीही कल्पनाच नाही हो, काहीही कमी नव्हत, काही चिठ्ठी नाही काही नाही. काय कारण झालं हेच कळत नाही) माणूस म्हणून जर आपण आपल्या मुला/मुलींना जसे आहोत तसे स्वीकारू शकत नाही तर बाकी सर्व देऊन काय उपयोग?*

हल्ली संन्यास घ्यावा असा विचार सारखा मनात येतो. मी जवळच्या एका मठात सेवेसाठी जायला लागलो आहे. वाटलं निदान हे आयुष्य सत्कारणी लावावं. मागच्या जन्माची पापं तरी धुवून निघतील. तिथे दररोज तीन तास सकाळी जायला लागलोय. झाडलोट करायची, तीर्थ द्यायचं, सांगतील ती कामं करायची. घरच्यांना संन्यासाबद्दल काही बोललो नाही, पण मी निदान देवाधर्माचं काहीतरी करतोय म्हणजे मला सद्बुद्धी येईल म्हणून घरचे जास्त काही बोलत नाहीत.

*लहानपणी शिकवलेल्या पाप-पुण्याच्या गोष्टी अशा-तशा थोड्याच जातात? मला तीर्थ आणि प्रसाद देऊन मुक्ती मिळत नाही हे सुदैवाने लवकर कळले.*

मला लोक इथे नोकरासारखे वागवतात. त्यांची सगळी कामं माझ्याकडून करून घेतात. स्वत: नुसते लोकांकडून पाया पडून घेतात. तिथल्या शिष्यगणांमध्ये एकमेकांबद्दल खूप मत्सर आहे.

*बाहेरच्या जगात जेवढा क्रोध, अहंकार, मत्सर पाहिला नाही तेवढे मी या वातावरणात पाहिले.*

त्यातला एक परमानंद म्हणून आहे. साठ एक वर्षांचा असेल. त्यांनी वयाच्या २५ व्या वर्षी संन्यास घेतला. तालीमबाज शरीर आहे. त्यांचं माझ्याकडे सारखं लक्ष असतं. कधीकधी सहज माझ्या नितंबावर त्याचा हात घासतो. सुरुवातीला मला हे कळत नकळत होतंय असं वाटायचं. पण आता मला जाणवतय की त्याला माझ्यात इन्टरेस्ट आहे. त्याचा माझ्या अंगाला हात लागलेला मला अजिबात आवडत नाही. मी त्याच्यापासून दूर रहातो.

माझं काम जास्ती वाढलंय, मीच एकटा काम करतोय की काय असं मला वाटायला लागलंय. मी मठात जाणं सोडून द्यावं असं वाटायला लागलंय.

मी उद्यापासून मठात जाणार नाही. संन्यास घ्यायचा विचार सोडला, ३५ वर्ष संन्यास घेऊन परमानंदाला काय मिळालं? ३५ वर्षी शरीराची उपासमार करून जर त्याची पुरुषांबद्दलची ओढ कमी झाली नाही, तर माझी कशी होईल? तिथंही राहून जर माझं इतकंच दुटप्पी धोरण असणार असेल तर निदान मी बाहेर राहून तरी काय करायचं ते करीन...

निदान उगाच काही सत्कर्म करतो अशी कोणाची फसवणूक तरी व्हायची नाही.

आई, बाबा ‘आता काय करायचं ठरवलंयसं?' असं सारखं विचारत असतात. माझ्याकडे काहीही उत्तर नाही.

अनिकेतनं मला मागच्या आठवड्यात फोन केला. त्याला परत मी भेटायला लागलो आहे. कोणीच साथीदार नसण्यापेक्षा हे सुद्धा बरं. एकटं रहाणं अशक्यचं. आज त्यानं माझ्याकडून ५०रु. उसने घेतले. पुस्तकासाठी हवे आहेत म्हणाला. मी खुशीने दिले. तो कसाही असला तरी तो मला आवडतो. तो एकचजण जगात आहे जो मला जवळ करतो.

काल आम्ही एका जुन्या पुस्तकांच्या दुकानातून एक मासिक आणलं. ‘सीमो लव्ह'. अनिकेतला कुठं काय मिळतं हे सगळं माहीत आहे. त्याला आपली मुलं कुठं जमतात, पुरुष समलिंगी वेश्याव्यवसाय कुठं चालतो हे सगळं माहीत आहे. मला ही सगळी ठिकाणं दाखवलीत त्यानं.

मासिकाचे १०० रुपये मी भरले. त्यात गोया विशी पंचविशीच्या मुलांचे सुंदर नग्न फोटो आहेत. त्याला होमो बी. एफ. (*ब्लू फिल्म*) कुठे मिळतात हेही माहीत आहे. मला होमो बी. एफ. बघायची आहे पण कुठे पहाणार हा प्रश्न आहे. सध्या ते मासिक त्याने त्याच्याकडे ठेवलं आहे. नंतर मी घेणार आहे.

अनिकेत आठवडाभर गावाला गेला आहे. सारखी त्याची आठवण येते. 'मी अनिकेतला काल एका दुस-या मुलाबरोबर कारमधून जाताना पाहिलं. त्याचं लक्ष नव्हतं. मला खूप राग आलाय. मला सांगितलं की मी गावाला जातोय'. येऊ दे परत. तोच होता तो. माझ्या शेजारी सिग्नलपाशी थांबला होता. वाटलं होतं काचेवर टकटक करावी. पण त्याला

अनपेक्षितपणे पहाण्याचा धक्का इतका मोठा होता, की मला काही चटदिशी सुचेना. काल रात्रभर झोप नव्हती.

आज आम्ही भेटलो. मी त्याला त्याच्या ट्रीपबद्दल विचारलं. चांगली झाली म्हणाला. डीटेलमध्ये वर्णन केलं. मी त्याला पाहिलं नसतं तर मला खरंच वाटलं असतं. मी त्याला पाहिल्याची ओळख दिली नाही. त्याच्याशी भांडायची हिंमत करत नाही, कारण तो मला सोडून देईल. पण मला या गोष्टीचा खूप मत्सर वाटतो. आपला बॉयफ्रेंड दुस-या बरोबर असावा हे मला सहन होत नाही. आज मी ते पोर्नोग्राफीक मासिक त्याच्याकडून घेतलं. माझ्या बेडरूमच्या कपाटाच्या मागे लपवून ठेवलं.

काल त्याने माझ्याकडून १०० रुपये घेतले. मागचे परत केलेले नाहीत.

*मी कपाटातून चोरून अनिकेतला पैसे देत होतो. माझा भाबडा समज होता, की त्याला पैसे दिले तर तो माझ्यापासून दूर जाणार नाही. लवकर त्या बाबतीतही शहाणपण आलं.*

आईने ठाम सांगितलंय की ती मला फुकट पोसणार नाही. मला माझ्या वयाबरोबर जबाबदारी कळलीच पाहिजे. बाबा माझ्याशी एक शब्दही बोलत नाहीत.

आईची एक कॉलेजची मैत्रीण आहे. तिच्या नव-याचं गॅरेज आहे. आई आज मला गॅरेजवर घेऊन गेली. पहिले तीन महिने काही पैसे मिळणार नाहीत पण निदान अनुभव येईल. मला गाड्या धुण्याचं काम देणार आहेत.

मी आजपासून कामावर जायला लागलोय. मला गाडया धुवायला लाज वाटते. बाबांनासुद्धा मी हे काम करावं असं वाटत नाही पण आई अजिबात ऐकायला तयार नाही.

गॅरेजमध्ये मला त्रास होतो. मला तिथली मुलं त्रास देतात. मला साध्यासाध्या गोष्टी येत नाहीत म्हणून टपला मारतात. त्यातल्या दोन जणांबद्दल मला ओढ आहे. त्यातला एक जण तर अगदी नालायक आहे. त्याच्याकडे पाहिलं, की मला जतीनची आठवण येते. दुसरा राजू म्हणून आहे. तो खूप चांगलाय. तो मला मदत करतो. मला कोणी त्रास द्यायला लागला की त्याला झापतो. कामानं माझे अंग खूप दुखतंय.

अनंतचतुर्दशीसाठी मावशी, काका, काकू आले आहेत. वीट आलाय. काकाकडे मात्र दोन दिवस जायची सोय नाही. लगेच काकू आजारी पडल्याचं नाटक करते आणि आईलाच स्वयंपाक करावा लागतो. आमच्या वाट्याला असले नातेवाईक का आले कोण जाणे. बाबांनी मी मेकॅनीक आहे अस सगळ्यांना सांगितलं.

आज सगळे गेले. यांच्या गाडीला अपघात झाला तर बरं होईल. कायमची पीडा संपेल.

काकूचा आज सुखरूप पोहोचल्याचा फोन आला. माझ्या नशिबात सुख नाही.

अनिकेत आता फक्त पैसे मागायलाच भेटतो. मी त्याला आज भीत भीत पैसे देणार नाही म्हणून सांगितलं. कसं कायं मला बळ आलं कोणास ठाऊक.

त्यानं मला धमकी दिली. नाही दिलेस तर घरी सांगेन. ब्लॅकमेल. मला धस्स झालं, काय बोलावं हेच सुचेना. म्हणाला चूपचाप दोनशे रुपये दे. नाहीतर.... मी थक्क होऊन त्याच्याकडे बघत होतो. तो दगडासारखा उभा होता. मला एकदम सणसणीत राग आला. ही माझ्या प्रेमाची परत फेड का? नाही देणार. जा काय करायचं ते कर'.

*ब्लॅकमेलला बळी पडणं महागात जातं. ब्लॅकमेलची त्या माणसाला चटक लागली की सुटत नाही.*

न तो चिडला. त्यानं मला शिव्या दिल्या. त्याच्या मनात माझ्याबद्दल एवढा द्वेष असेल असं मला स्वप्नातदेखील वाटलं नव्हतं. मला म्हणाला, 'गांडू साला. दुस-याने तुला ठोकायचीच तुझी लायकी आहे. मी तुझ्यावर दया करून तुझ्याबरोबर फिरत होतो. नाही तर तुझ्याकडे कोण कुत्रं बघणार.' त्यानं माझ्या एक मुस्काटात मारली आणि निघून गेला. माझं अंग मला गरम लागतंय. मला गुदमरायला होतंय. कुणाशी तरी भडभडून बोलावंसं वाटतंय.

*मला परतपरत समलिंगी लोकांसाठी एखाद्या सुरक्षित जागेची (सेफ गे स्पेस) कमतरता जाणवत होती. तेव्हा असे सपोर्ट ग्रुप्स नव्हते.*

आज मला बरं वाटतयं. मागच्या आठवडाभर मला सणसणून ताप आला होता. चारपर्यंत गेला होता. आता थकवा आहे पण ताप गेलाय. माझं सगळं अंग गळून गेलंय.

....

मी आता कामाला सरावलोय. मला आता मुलं त्रास देत नाहीत. मी मनापासून काम करतो. मालकांनी आज मला गाड्या धुण्याच्या कामातून काढून का? मेकॅनिक बरोबर त्याच्या हाताशी ठेवलंय. मला गाड्या रिपेअर करायचं काम खूप आवडतं.

माझं वजन कमी झालंय. शरीर टणक जाणवायला लागलंय. हाताच्या रेषा छान दिसायला लागल्यात. मी कधीकधी बेडरूमचं दार लावून सगळे कपडे काढून आरशात बघतो. स्वत:च्या शरीरावरून हात

फिरवतो. मला माझं शरीर आवडायला लागलंय. मी जर दुसरा कोणी असतो तर मला माझ्याबरोबर सेक्स करायला आवडला असता.

मला या महिन्याला ३०० रुपये मिळाले. मी आईबाबांना जेवायला घेऊन गेलो. माझ्यावरचा घरच्यांचा रोष कमी झालाय. माझा आत्मविश्वास वाढायला लागलाय.

मला एका साथीदाराची गरज आहे. जो माझ्याशी एकनिष्ठ राहील. आमचं एकमेकांवर प्रेम असेल. नुसतं शारीरिक प्रेम नाही. भावनिक प्रेम असेल. आपुलकी असेल. असा मुलगा कुठे मिळेल? आयुष्यभर एकटं रहाणं मला जमणार नाही.

काल आम्ही सगळे एका लग्नाला गेलो होतो. तिथं एक मावशी चिरपली 'आता याचा बार लावून द्या'. ही चोमडी वधूवरसूचक मंडळ चालवते. आई म्हणाली स्थळं यायला लागली आहेत. एकदा याचं लागी लागलं की आम्ही सुटलो. पण अजून एक दोन वर्षांनी बघू. त्याला अगोदर जरा स्थिरस्थावर होऊ दे. मावशी म्हणाली, "आता बघायला लागा... सगळं ठरेस्तोवर वर्ष जातंच' मादरचोद साली. आपले सगळे नातेवाईक मेल्याशिवाय आपण सुखी होऊ शकत नाही. मला टेन्शन आलंय.

राजू एका पोरीला फिरवतोय. तिला गॅरेजवर घेऊन येतो. इतरांसमोर मिरवतो. तिच्याबरोबर काय काय केलं ते वर्णन करून सांगतो. इतरांना जळवायला बघतो. मला त्याचा द्वेष वाटायला लागलाय.

काल अनर्थ झाला. मी कामावरून आलो तर आई खूप रागात होती. मी घरात पाय ठेवताच म्हणाली, "मला तुझ्याशी बोलायचंय'. बाबाही बसले होते.

"काय झालं' - मी.

‘हे काय आहे’ - आई. माझ्यापुढे आईनं ‘होमो लव्ह' मासिक भिरकावलं. मला काय बोलावं तेच सुचेना.

‘माझ्या खोलीत तू कशाला गेली होतीस’ - मी ओरडलो.

बाबांनी उठून माझ्या तोंडात मारली. 'हे मासिक या घरात काय करतंय?'

माझा चेहरा गरम झाला होता. माझा घसा दाटून आला. काय बोलायचं हे कळेना. पण एकदम खूप बोलावंसं वाटत होतं.

‘मी काय विचारतीय’ - आई I ‘जीभ झडली का तुझी?' - बाबा

‘कोणी तुला नादी लावलं का? घाबरू नकोस. न भीता सांग. आम्ही त्याच्याकडे बघून घेऊ’ - आई.

मी नकारार्थी मान हलवली.

“अरे पण मग कारण काय? हे... हे तुझ्याकडे कसं काय?' - बाबा. माझ्या डोळ्यांत पाणी. खाली मान. म्हणालो, ‘मला मुलं आवडतात.'

आई आ वासून उभी. वडिलांच्या चेह-यावर किळस.

****

# त्रिशंकू

घर पूर्ण शांतय.

मध्येच ‘तुझ्याकडे बघून असं कधी वाटलं नाही की’.. - आईचं पुटपुटणं.

‘तुझे लाड भोवलेत' बाबांचे आईवर खेकसणं. लोकांना कळलं तर शेण घालतील आपल्या तोंडात, लोकांना थोबाड दाखवायला जागा उरली नाही.' -बाबा.

‘कुठे चुकलं आमचं... काय चुकलं?' - आई

हे अनैसर्गिक आहे. आमचं नशीबच गांडू... मागच्या जन्माचं हे पाप घरी आलंय. आता तूच संभाळ त्याला. माझा काही संबंध नाही. तू लाड केलेस ना, आता भोगं तुझ्या कर्माची फळे.' - बाबा.

> *काही मुले-मुली समलिंगी का होतात, याचं कारण कोणालाही माहीत नाही, जशी काही मुलं-मुली भिन्नलिंगी का होतात हे माहीत नाही. कोणाचा काहीही दोष नाही. पालकांचाही नाही आणि मुलांचाही नाही. पालक आणि मुलं उगाचच स्वतःला दोष लावून घेतात. समलैंगिकता नैसर्गिक आहे. अनैसर्गिक नाही. कित्येक प्राणी, पक्षी आणि मासे आहेत ज्यांच्यात समलैंगिकता आढळते. उदा. डॉल्फिन, शार्क, पोपट, बगळे, हत्ती, हनुमान लंगूर,*

बाबा शून्यात बघत बसतात. आईला अजूनही विश्वास बसत नाही. मला एकदम रितंरितं वाटतंय, एक मोठं ओझं माझ्या डोक्यावरून कमी झालंय. आता जे काय व्हायचं ते होऊ दे.

*मी हुन जर सांगितलं असतं तर बरं झालं असतं असं आता मला वाटतंय. पण आता मागून विश्लेषण करणं सोपंय. कसं धाडस नाही येणार आपण होऊन सांगायचं? जी मुलं - मुली आपणहून सांगतात त्यांच्याबद्दल मला मनापासून आदर वाटतो. Courage that was absent in me.*

*रमेशनं घरी सांगितलंचं नाही. त्याच्या घरचे कोणीच विचारत नाही की त्यानं लग्न का नाही केलं. रमेश म्हणतो त्यांना बहुतेक संशय असावा. ही 'डोंट ओस्क डोंट टेल पॉलिसी त्याच्या घरच्यांना चालते. पण सगळ्यांच्या घरी हे चालत नाही. प्रतीक, लुकस, शर्मिलानी घरी स्वतःहून सांगितलं.*

*प्रतीक आणि लुकसच्या घरचं वातावरण वेगळंय. घरचे खूप उदारमतवादी आहेत. घरचे कसे आहेत याचा अंदाज घेऊन त्यांनी सांगितलं. बहुतेकांच्या घरचे सनातनी असतात. शर्मिलाचा अपवाद आहे. घरचे खूप सनातनी आहेत. पण ती खूप धाडसी आहे.*

*प्रत्येक मुला-मुलीला समजूतदार आईवडील कुठून मिळणार? एवढे धाडस प्रत्येकानं करायला पाहिजे, हे जरी खरं असलं तरी प्रत्येकजण ते धाडस कोठून आणणार? माझ्या घरच्यांना ते मासिक सापडल नसतं तर?*

*मी लग्नाला उभा राहिलो असतो का? लग्न केलं असतं तरी मला बायकोबरोबर शारीरिक संबंध ठेवता आले असते का? नसते तर? तिच्या आयुष्याचं काय झालं असतं? माझ्या आयुष्याचं काय? महेशला घटस्फोट घ्यावा लागला कारण त्याला बायकोबरोबर शारीरिक संबंध ठेवता येईनात. शारीरिक*

*संबंध जमले तरी भावनिक गरजांचं काय? त्या कशा पु-या होणार? ज्या व्यक्तीशी आपण शारीरिकदृष्ट्या आणि भावनिकदृष्ट्या जवळीक साधू शकत नाही अशा व्यक्तीशी कसा काय संसार करणार? ते नातं फक्त चारचौघांना दाखवण्यासाठी होतं.*

*लुकसनी त्याच्या मम्मीला सांगितलं तर ती म्हणाली लग्न झालं की सगळं ठीक होईल. तो मम्मीला म्हणाला - 'मिताली (त्याची बहीण) चं लग्न एका 'गे' मुलाशी लावून देशील का?' सुदैवाने त्याच्या मम्मीला हे आर्गुमेंट पटलं. त्या समजूतदार आहेत. माझे काही 'गे' मित्र आहेत ज्यांनी लग्न केलं आहे. काहींना मुलं आहेत. काहीजण प्रामाणिकपणे कबुली देतात, की त्यांच्या बायका लैंगिकदृष्ट्या सुखी नाहीत कारण कर्तव्यापुरताच त्यांचा त्यांच्या बायकोशी संबंध येतो. त्यात आपुलकीला, आनंदाला, प्रेमाला, भावनेला स्थान नाही. यातले काही पुरुष इतर पुरुषांशी बाहेर संबंध ठेवतात.*

बाबा आता घरी काहीच बोलत नाहीत. आईशी सुद्धा नाही. सारखे टीव्ही समोर बसून रहातात. आई जेवढं लागेल तेवढंच बोलते. एकदा म्हणाली, 'कधी असं जाणवायला लागलं? अगोदर का नाही सांगितलंस? आमच्यावर विश्वास नाही का तुझा? आम्ही कमी पडलो'. यात कोणाचाही दोष नाही हे आईला कळत नाही. तिला मी कसे दिवस काढले हे कधीही समजणार नाही. कितीही प्रयत्न केला तरी. त्यामुळे तिच्याशी कसा संवाद साधायचा हेच कळत नाही.

आज ती मला एका 'बाबा' कडे घेऊन गेली. त्याच्याबरोबर त्याचे शिष्यगण होते. आईला सांगायला लाज वाटत होती. मलाही संकोच वाटत

होता. मी मान खाली घालून उभा होतो. आई - 'याला काहीतरी सांगा ... लग्न करायचं नाही म्हणतो. मुलींची आवड नाही. मुलांची आहे'. आईनं त्याच्या पायावर डोकं ठेवलं. मला खूण केली. मला त्याच्या पाया पडायचं नव्हतं. पण तरीही पडलो. दर अमावास्येला नैवैद्य करून गच्चीवर ठेवायचा. कावळयांसाठी. मी आणि आईने गुरुवार करायचे. आईनं विचारलं 'कधी फरक दिसेल?' तर तो म्हणांला, 'सांगता येणार नाही'.

मी आणि आई गुरुवार करायला लागलो आहे. मी सांगितलं की 'याचा काहीही उपयोग नाही... माझ्यात बदल होणार नाही'. ती कळवळून म्हणाली, "अरे तुझ्यासाठी नाही तर निदान माझ्यासाठी तरी कर... मी आहे तोपर्यंत... नंतर बंद कर'. रडायला लागली. मला अपराधी असल्यासारखं वाटतयं. मी काय केलं मलाच कळत नाही. मला आता घरातून पळून जावंसं वाटतय. घरच्यांपासून कुठेतरी दूर...

मी कामात जास्तीत जास्त वेळ रमवून घेतो. घरी फक्त जेवायला आणि झोपायला असतो. घरी आलं की मला दडपण येतं.

आत्तापर्यंत चार ज्योतिष्यांना आईनं पत्रिका दाखवली. एकानं ठामपणे सांगितलं, की माझं लग्न होणार. या वर्षात. आईने हळूच माझ्याबद्दल सांगितलं. त्यांनी सांगितलं, की लग्न करा म्हणजे सगळं ठीक होईल. आई परत स्थळ शोधायला लागली आहे. माझं आईशी यावरून कडाक्याचं भांडण झालं. माझं लग्न ठरलं तर मी सगळ्यांना सांगेन मी कोण आहे अशी धमकी दिली.

आईला माझं लग्न ठरवायची आणखी दोन कारणं आहेत. ती मला सारखी म्हणते, 'आत्ता आम्ही आहोत नंतर तुझं कोण बघणार?' आणि दुसरं कारण मी एकुलता एक. ना भाऊ ना बहीण. त्यामुळे घरच्यांना वंशाचा दिवा हवाय.

*समलिंगी जोडप्यांना एकत्र राहू दिलं तर ते दोघं एकमेकांना सांभाळतील, एकमेकांना आधार देतील. समाजाला स्वीकारायला वेळ लागेल हे खरंय पण Loving, Understanding, Caring, Sharing, Concern या गोष्टी फक्त भिन्नलिंगी जोडपी करु शकतात हा गैरसमज मनातून काढून टाकला पाहिजे, पण हे आर्ग्युमेंट लोकांना झेपत नाही आणि वंशाच्या दिव्याचा प्रश्न असेल तर समलिंगी जोडप्यांना मूल दत्तक घ्यायला संमती द्या.*

आई आजारी पडली आहे. ती काही खात नाही, अशक्त झाली आहे. मी तीन दिवस रजेवर आहे. सध्या स्वयंपाक मी करतो आहे. बाबा काहीही करत नाहीत. कामावरून येतात आणि टीव्ही समोर बसतात. ताट बाहेर घेऊन जातात आणि टीपॉयवर ठेवून जेवतात. एका शब्दाने आईची चौकशी करत नाहीत.

आईला आता बरं वाटतंय. पण अशक्तपणा खूप आहे. मला मागचे तीन दिवस झोप नाही. आईच्या आजारपणाला मी जबाबादार आहे. आम्ही कुठल्या जन्मीचं पापं फेडत आहोत कोण जाणे.

मी कामावर जायला लागलो. घरी यायची इच्छाच होत नाही.

....

मालकाला माझं काम आवडतं. मला जास्त जबाबदारीची कामं दिली जातात. पगार वाढलाय.

आज पेपरमध्ये एका सायकियाट्रिस्टचा लेख आलाय. मेंटल डिसऑर्डर्सवर. त्यात त्यानं समलैंगिक असणं ही डिसऑर्डर आहे असं लिहिलंय. अशी मुलं बरी होऊ शकतात हेही लिहिलंय. त्यांचा फोन नंबर आईने डिरेक्टरीतून काढला. ॲपॉईंटमेंट घेतली. मला जायला लाज वाटत

होती. मनातून जाणवत होतं, की वेळ आणि पैसा फुकट घालवतोय. पण आईसाठी जीव अडकतो.

*गंमत म्हणजे 'बाबा', ज्योतिषी अपयशी ठरल्यावर आईला मला सायकियाट्रिस्टकडे न्यायचं सुचलं.*

त्यांनी नीट दोघांचं ऐकून घेतलं. सांगितलं की ही विकृती आहे. शॉक थेरपीनी मला बरं करता येईल. निदान एक-दोन वर्षेतरी ट्रीटमेंट घ्यावी लागेल. दर १५ दिवसांनी एक सेशन. एका सेशनचे २०० रुपये पडतील. वर बजावलंय, की मी मनापासून प्रयत्न केला पाहिजे नाहीतर ट्रीटमेंटचा काहीही उपयोग नाही. आई म्हणाली, "तो पूर्ण प्रयत्न करेल. तेवढं त्याला ठीक करा. जन्मभर उपकार विसरणार नाही.' आईला असं लाचार माझ्यामुळे व्हायला लागतं आहे. मला हळूहळू तिचा पण राग यायला लागला आहे.

डॉक्टर मला नागड्या मुलांची चित्रं दाखवतो. माझ्या लिंगाला ताठरपणा आला की शॉक देतो. मला खूप त्रास होतो. वेदना होतात. माझा नोकरी करून मिळवलेला आत्मविश्वास हळूहळू कमी व्हायला लागलाय. स्वत:ला मारून एक नवीन पुरुष माझ्या ठिकाणी बसवणं कधीही शक्य नाही. मला या डॉक्टरचा द्वेष वाटायला लागला आहे. त्याला मला शॉक द्यायला आवडतंय, माझी वेदना त्याला बद्यायला आवडते असा मला संशय यायला लागला आहे. माझी हीच लायकी असं त्याला वाटत असेल का?

*आपल्या देशातले अनेक डॉक्टर अत्यंत सनातनी विचारांचे आहेत. अनेक डॉक्टरांनी माझ्यासारख्या अनेकजणांवर 'बरं होण्यासाठी असले क्रूर प्रयत्न केले आहेत. प्रयत्न करायच्या आधी WHO (World Health Organization) 3710T*

*APA(American Psychiatrist Association) याला डिसऑर्डर मानत नाहीत असं सांगतात आणि पुढे म्हणतात, पण 'पेशंटला' इच्छा असेल तर आम्ही प्रयत्न करायला तयार आहोत. टिपीकल दुटप्पी धोरण. जिथं हा आजार नाही तर त्याला औषध कशाला? अशी अनेक मुलं अशा त्रासाला कंटाळून आपण बरे झालो आहोत असं भासवतात. आईवडिलांना वाटतं आपला मुलगा-मुलगी बरी झालीय आणि डॉक्टरांना वाटतं की आपले प्रयोग यशस्वी झालेत. सत्य परिस्थितीच्या सामोरी जायची कोणाची तयारी नाही की हा आजार नाही, विकृती नाही. समाज बदलणार नाही म्हणून आपण अशा मुला-मुलींना बदललं पाहिजे हे धोरण चुकीचं आहे. समाजाचा दृष्टिकोन बदलला पाहिजे.*

मी जेवढा पुरुषांबद्दल विचार करायचा टाळतो तेवढे हे विचार मला भेडसावतात. डॉक्टर म्हणतो मी बरं व्हायचं मनावर घेतलं पाहिजे. पण कसं घेणार? पाण्याची जशी तहान लागते तशी मला पुरुषांची ओढ आहे. हा भोसडीचा कोणाला फसवतोय? मला, आईला का स्वत:ला?

....

मला साथीदार मिळणार नाही. मग भावनिक आणि शारीरिक सुखाचं काय? त्या इच्छा कशा पु-या करणार? का आयुष्यभर असंच उपाशी तळमळत रहायचं? विधवा किंवा लग्न न झालेले स्त्री-पुरुष कसे जगत असतील? त्यांनी बाहेर संबंध ठेवले तर लोक त्यांच्या तोंडात शेण घालतात पण त्यांच्या गरजांचं काय?

मी काल सिनेमाला गेलो होतो. टॉम क्रूजच्या ‘टॉप गन’ला. मी आत्ता पर्यंत पाहिलेला तो सर्वात चिकणा पुरुष आहे.

काल मी परत 'टॉप गन' पाहिला. रात्रीच्या शोला गेलो होतो, मी खूप उत्तेजित झालो होतो. सिनेमा सुटल्यावर मी अनिकेतनी दाखवलेल्या एका ठिकाणी गेलो. तिथं एकजण होता. मी तिथे घुटमळलो. तो माझ्या शेजारी आला. त्याने मला खुणावलं आणि चालता झाला. मी त्याच्या मागून आडबाजूला गेलो. त्याने एकदम माझ्या मुस्काटात मारली. म्हणाला, "चल ठाण्यात.' मी घाबरलो. एकदम घामाने ओला चिंब झालो. मुतायला लागायच्या बेताला आलो. मी गयावया करायला लागलो.

तो म्हणाला "तुला लावून घ्यायचाय ना? चल चौकीत'

मी रडायला लागलो. तो माझा हात धरून मला ओढायला लागला.

'नको नको प्लीज' मी विनवायला लागलो. म्हणाला, 'चल पैसे काढ'. मी पाकीट काढलं. त्यानं सगळे पैसे घेतले. आईने दिलेली सोन्याची चेन घेतली. निघून गेला.

> *तो पोलिस होता का? का एक सराईत गुंड होता? या दोघांतला फरक कसा कळणार? तो पण समलिंगी असेल का? अजूनही मला वारंवार अशा गोष्टी 'गे' सपोर्ट ग्रुपमध्ये ऐकायला मिळतात. कोणाला सांगणार आणि काय सांगणार? पोलिसात कशी तक्रार करणार? समलिंगी संभोग कायद्याने गुन्हा आहे (IPC 377). ह्या कायद्यात जोपर्यंत बदल होत नाही तोपर्यंत आमच्या लोकांना अत्याचार निमूटपणे सहन करावे लागणार. कोणाकडे दाद मागणार?*

डॉक्टरकडे जाणं बंद केलंय. माझ्या अपेक्षेप्रमाणे या मादरचोदच्या ट्रीटमेंटचा काहीही उपयोग झालेला नाही. फुकट वेळ, पैसा आणि मनस्ताप. आईला निक्षून सांगितलं की मी आता डॉक्टरकडे जाणार नाही. तिची रडारड सुरु झाली. म्हणाली, "मी डोकं आपटून जीव देईन'. म्हटलं

'खुशाल दे'. वीट आलाय मला या रोजच्या तमाशाचा. मी सिनेमाला निघून गेलो. मला हळूहळू घरच्यांबद्दल काहीही वाटेनासं झालंय. त्यांना काही कळतच नाही.

मी आता गॅरेजच्या मुलांबरोबर दारू प्यायला लागलो आहे. पहिल्यांदा संकोच वाटत होता पण आता मला आवडायला लागलंय. फक्त जास्त पीत नाही. मला भीती वाटते, की मला चढली तर मी राजूचा पापा घेईन आणि सगळा गोंधळ होईल. मी मित्रांबरोबर प्यायला लागल्यामुळे माझा भाव वधारला आहे.

मला एकटेपणा सतावतो आहे. कोणाशी बोलता येत नाही. कोणाला माझे न सांगता येत नाहीत. घरच्यांचा त्रास कमी आहे कारण संवादच नाही. पण माझं काय? माझ्या भावनिक आणि शारीरिक गरजांचं काय? मी असं एकटंच आयुष्य काढायचं का? कोणाला तरी जवळ घ्यावं अशी खूप इच्छा होते. मनानं आणि शरीरानं त्याचं व्हावं. आपल्या हे नशिबात आहे का?

काल मी एकटाच दारू प्यायला गेलो. घरच्यांना सांगितलं, की गॅरेजमध्ये खूप काम आहे. यायला फार उशीर होईल. दूरच्या एका बारमध्ये गेलो. खूप प्यालो. मग एका माहितीच्या ठिकाणी गेलो. नशेमुळे माझी भीड चेपली. कोणाला तरी ५० रुपये दिले. मला त्याचा चेहरा अंधारात दिसला नाही, का आता मला तो आठवत नाही, कोण जाणे. मी कुठे कशी रात्र काढली हे आठवत नाही.

> *एकदा वाईट अनुभव आल्यावर मी परत अशा जागी तडफडायला कशाला गेलो? भूक अनावर झाली की काहीही करायची तयारी असते. ही गोष्ट रोज जेवणा-याला कळणार नाही,*

*तेव्हा माझ्याकडे निरोध नव्हता. असता तरी एवढया पिलेल्या स्थितीत आपल्याकडे निरोध आहे हे लक्षात आलं असतं का? असतं तरी त्याच्या लिंगावर चढवायचं भान राहिलं असतं का?*

....

आज मी परत त्या ठिकाणी गेलो होतो. बाहेर एक पोरगा भेटला. तो माझ्याजवळ आला.

‘किती वाजलेत’- तो

‘९.३०... तुझ्याकडे घड्याळ आहे ना?’- मी

तो नुसता हसला.

‘येतोस का?’ -मी

‘चला चहा पीऊयात’ - तो

आम्ही जवळच्या एका हातगाडीपाशी गेलो. दोन कटींग मागवल्या. त्यांचे नाव नरेन. म्हणाला, ‘मी एका एन.जी.ओ.साठी काम करतो. ती समलिंगी लोकांसाठी काम करते. त्या संस्थेचा 'गे' सपोर्ट ग्रुप आहे. ('गे' म्हणजे समलिंगी हा शब्द आज मी पहिल्यांदा ऐकला.) एच. आय. व्ही. आणि गुप्तरोगाची चाचणी NARI (National AIDS Research Institute, Bhosari, Pune) कडून आम्ही करतो.' मला त्यानी त्याच्या संस्थेच्या हेल्पलाईनचा फोन नंबर दिला. नरेन पण 'गे' आहे. मी त्याला सांगितलं, की माझं नाव राहूल आहे. तो म्हणाला ‘हवं असेल तर तुला ट्रस्टमध्ये घेऊन जाईन.' मी अस्वस्थ झालो. मला कुठल्याही ग्रुपमध्ये जायचं नाही.

*ही अस्वस्थता माझ्या अनेक मित्रांनी अनुभवली आहे. 'गे' सपोर्ट ग्रुपकडे आधारासाठी जाणं हे खूप अवघड आहे. मला*

*वाटतं आऊट (आपण 'गे' आहोत हे स्वीकारणे आणि इतरांना अभिमानाने सांगणे) होण्या खालोखाल हीच सगळ्यांत अवघड गोष्ट आहे.*

*एक तर भीती असते. कोणी ओळखीचं भेटलं तर? आता कोणी ओळखीचं भेटलं तर तो कशा करता तिथे आलाय हे आपल्यालाही विचारता येतं, पण अशा तटस्थपणाने या गोष्टीकडे बघता येत नाही. कोणी आपल्याला या संस्थेत जाताना पाहिलं तर? तिथे गेलो आणि काही वेडावाकडा प्रकार घडला तर? तिथे पाऊल टाकणं म्हणजेच तुम्ही समलिंगी आहात असं जाहीर करणं. कोणाला आपलं नाव कळलं आणि त्यानं ब्लॅकमेल केलं तर? कोणाला सांगणार? नाही नाही त्या गोष्टी मनात येतात.*

*आणि कदाचित खोलवर अजून एक जाणीव असते, की आता डिनायलची स्टेज संपली आहे. त्या स्टेजमधून बाहेर पडायची इच्छाच नसते. कारण पुढे कन्फ्रंटेशनची स्टेज येणार आहे हे माहीत असतं.*

*आपण कोण आहोत ही कबूली द्यायचं आणि स्वीकारायचं हे पाऊल असतं. काही समलिंगी मुला-मुलींना अशा संस्थांबद्दल द्वेष पण असतो. कोणीतरी आपल्यासाठी अशा होमोफोबीक वातावरणातसुद्धा काम करतंय ही गोष्ट जळफळाट निर्माण करते आणि म्हणून काहीजण अशा संस्थांकडे जात नाहीत.*

नरेननी 'निरोध हवे का?' विचारलं. मला हवे होते पण ठेवणार कोठे? घरच्यांना निरोध पाकिटात मिळाले तर? आहे तो त्रास काय कमी आहे?

*निरोध ठेवायचा प्रश्न बहुतेक सगळ्यांना भेडसावतो. आपल्याकडे प्रायव्हसी ही कन्सेप्ट नसल्यामुळे कोणीही आपले खिसे, पाकीट, बॅग, पत्र न विचारता परस्पर उघडतात. त्यामुळे लोक स्वतःजवळ निरोध ठेवत नाहीत. (ते सेक्शुअली ॲक्टिव्ह असले तरी) आणि मग जेव्हा लागेल तेव्हा निरोध लगेच उपलब्ध होईल अशी खात्री नसते. मग असुरक्षित सेक्स होईल तर नवल काय?*

नरेनं चांगलाय दिसायला. मी त्याला सेक्सची मागणी केली. तो नाही म्हणाला. काहीतरी ट्रस्टच्या नियमांबद्दल बोलला, नाही करायचं तर गेला उडत. मला राग आला. त्याच्यासारखे छप्पन मिळतील. घरी आल्यावर त्याने दिलेला फोन नंबर फेकून दिला.

नरेन मला परत भेटला. त्याच ठिकाणी दररोज रात्री ९.३० वाजता तो चक्कर मारतो.

'ऑफिसवर गेला होतास का?'- तो. 'वेळ झाला नाही' - मी.

'एकटं जायला भीती वाटत असेल किंवा ऑफिसवर जायला धीर होत नसेल तर मी बरोबर येईन, किंवा तुला ट्रस्टमधल्या लोकांना बाहेर भेटायचं असेल तर तसंही करता येईल. घाबरू नकोस. तुझं खरं नाव सांगू नकोस. तुला एकही पैसा द्यायला लागणार नाही. कोणी तुझ्याशी बरंवाईट वागेल अशी तुझ्या मनात भीती असेल तर आपण एखाद्या रेस्टॉरंटमध्ये भेटू. काळजी करू नकोस'. -तो

मी म्हणालो विचार करीन. मी त्याला परत सांगितलं, की मला त्याच्यात इंटरेस्ट आहे. पण त्याला माझ्यात नाही. त्यानं मला सांगितलं, की त्याचा एक बॉयफ्रेंड आहे आणि तो त्याच्याशी एकनिष्ठ आहे

'कोणाला कळणार आहे तू माझ्याबरोबर संबंध ठेवलेस तर?' - मी.

‘माझं त्याच्यावर प्रेम आहे. मला इतर कोणीही आवडलं तरी मी त्यांच्याबरोबर जाणार नाही. नात्यात विश्वास फार महत्त्वाचा असतो’ - तो.

माझा अहंकार दुखावला गेला. मी जास्त बोललो नाही. काहीतरी कारण काढून निघून गेलो.

*मला राग आला होता त्याला नुसता माझा अहंकार दुखावणं कारणीभूत नव्हतं. त्याच्या वाट्याला एक मुलगा येतो, त्यांचं एकमेकांबद्दल प्रेम आहे, विश्वास आहे आणि कोणी आपणहून जरी सेक्सची मागणी केली तरी त्याला तो नाही म्हणतो ही गोष्ट मला खूप त्रास देणारी होती. असं परिपूर्ण नातं असू शकतं हे मला पहिल्यांदा जाणवायला लागलं. तोपर्यंत फक्त अंधारात शरीरसुख घेणारे भेटले होते. असं नातं माझ्या नशिबात नाही ही गोष्ट मला सगळ्यांत जास्त झोंबली. मला त्याच्याबद्दल आणि त्याच्या बॉयफ्रेंडबद्दल कमालीचा मत्सर वाटायला लागला. मला तिथे थांबवेना म्हणून जळफळाट करत मी तेथून निघून गेलो होतो.*

*मला जेव्हा इरू भेटला तेव्हा अनेकजणांना आमच्या नात्याचा खूप हेवाही वाटायचा आणि त्याचबरोबर मत्सरही. त्यात काही माझे जवळचे मित्रसुद्धा आहेत, पण आता मी त्यांना दोष देत नाही. तेव्हा द्यायचो. तेव्हा खूप चिडचिड व्हायची. आपल्या वाईटावर टपले आहेत अस मी इरूला नेहमी सांगायचो. पण मग तो म्हणायचा तुझ्या वाटयाला जेव्हा असं सुख नव्हतं तेव्हा तूही असाच वागला आहेस. या कोंडमा-यात आपल्या सगळ्यांच्यात असूया आणि डिस्ट्रक्टीव ॲटीट्यूडस निर्माण*

*झाले आहेत. त्या एवढ्या सहजासहजी जाणार नाहीत, तशी अपेक्षा धरत असशील तर अजून त्रास होईल.*

मला संडासच्या जागी जखम झाली आहे. संडासला खूप त्रास होतो. मला गुप्त रोग झालाय का? एच. आय. व्ही. ची लागण झालीये का? मला दिवसभर चैन पडलं नाही. जेवण गेलं नाही. डबा तसाच घरी घेऊन आलो.

काय करायचं सुचत नाही. डॉक्टरकडे जावं का? फॅमिली डॉक्टरकडे जाण्याचा प्रश्नच येत नाही. मग कुठल्या? आणि त्यांनी उलटसुलटं काही विचारलं तर? काय उत्तर देणार? त्यांनी शिव्या दिल्या तर? नको. डॉक्टरकडे जाण्यात अर्थ नाही. थोडा वेळ अंगावर काढू आणि बघू बरं वाटतंय का.

आठवडा झाला, नरेनला भेटलो नव्हतो. आज त्याला भेटलो. चहा प्यायला गेलो. त्याच्याशी बोलून बरं वाटतं. दुसरं कोणीही बोलायला नाही. संकोचत त्याला म्हणालो, 'माझ्या एका मित्राला प्रॉब्लेम झालाय. त्याला संडासच्या जागी जखम झाली आहे. त्यानं बाहेर निरोध न वापरता पॅसिव सेक्स केला. तुला काही औषध माहीत आहे का?”

'गुप्तरोग असू शकेल. तुझ्या मित्राला तपासून घ्यायला सांग. त्याला हवं असेल तर 'नारी'च्या मंडईतल्या गाडीखान्याच्या, क्लिनिक मध्ये त्याला मी घेऊन जाईन' - तो.

कळवतो मी माझ्या मित्राला. त्याला जर डायरेक्ट जायचं असेल त्या दवाखान्यात तर? कुठं जायचं?' - मी.

त्यानं मला गाडीखान्याचा पत्ता, फोन नंबर आणि खोली नंबर दिला.

'तुझ्या ऑफिसचा पण फोन नंबर परत दे. माझ्या हातून हरवलाय' - मी.

'तपासायला आणि औषधाला पैसे पडत नाहीत' - तो

'पण त्यांना कळलं की तो 'गे' आहे तर?' - मी.

'काही घाबरायचं कारण नाही. एकदम समजून घेणारी माणसं आहेत. ते नावं ठेवणार नाहीत, वाईट वागवणार नाहीत. त्यांना खोटं नाव द्यायचं. ते पत्ता/ फोन नंबर काही मागत नाहीत. तो एकटा जायला घाबरत असेल तर मी घेऊन जाईन. पण न चुकता जायला सांग. लक्षणं गेली म्हणजे गुप्तरोग बरा झाला असं नाही. वेळेवर ॲलोपॅथीक औषधोपचार घेतले नाही तर महागात जातं.' - तो.

माझ्या छातीत धस्स झालं. मला तो घेऊन गेला असता तर खूप बरं वाटलं असतं. पण मी मूर्खासारखी माझी आफत एका काल्पनिक मित्रावर ढकलली. मला एकट्यालाच गेलं पाहिजे. धीर होत नाही. आज मी भीत भीत गाडीखान्यात गेलो होतो. तिथं बाहेरच्या गुरख्याला पाहून तसाच मागे परत आलो.

*माझे काही मित्र बिनधास्त आहेत. त्यांना अशी भीती - बीती काही नसते. मी मात्र खूप घाबरट आहे.*

आज मला बरं वाटतंय. मी धाडस केलं. म्हटलं असं बेचैन रहाण्यापेक्षा एकदाचं जे काय व्हायचंय ते होऊ दे. घाबरत घाबरत मी गाडीखान्यातल्या 'नारी'च्या खोलीवर गेलो. फार गर्दी नव्हती. मला पाच रुपये देऊन केसपेपर काढायला सांगितला. मी नाव खोटं दिलं तेव्हा माझी जीभ अडखळत होती. हात कापत होते. मी नरेनला बरोबर घेऊन यायला पाहिजे होतं. माझ्याशी तिथे सगळेजण चांगले वागले. डॉक्टर, काऊन्सेलर. मला सगळी माहिती विचारली. मला खूप लाज वाटत होती.

पण त्यांनी मला समजून घेतलं. नावं ठेवली नाहीत. मी पुरुषाबरोबर दोन आठवड्यापूर्वी मागुन केला होता हे सांगितलं. दारू पिऊन केला होता हेही सांगितलं होतं. डॉक्टरांनी तपासलं. मला अर्धा तास बसायला सांगितलं. त्यांनी तपासणी केल्यावर मला सांगितलं, की मला शैक्रॉईड गुप्तरोग झालाय. तो औषधाने बरा होतो. एरिथ्रोमायसिनचा सात दिवसांचा कोर्स दिला. त्यांनी गुप्तरोग, एच. आय. व्ही., विंडो पिरेडची माहिती दिली. निरोध कसा वापरायचा ते दाखवलं. मी सांगितलं मला एच. आय. व्ही. ची टेस्ट करायची आहे. त्यांनी मला विंडो पिरेड झाल्यावर तपासायला यायला सांगितलं.

.....

मागचे अडीच महिने मी हवेवर आहे. मला एच. आय. व्ही. ची लागण झाली असली तर? आज मी 'नारी'मध्ये रक्त तपासायला गेलो. आज मला जायला मागच्या वेळीसारखी भीती वाटली नाही. प्रिटेस्ट काऊन्सेलींग झाल्यानंतर त्यांनी माझं रक्त तपासणीसाठी घेतलं. मला एक बिल्ला दिला. त्यावर एक आकडा आहे. तो बिल्ला घेऊन मला आठवड्यानं बोलावलंय.

मला काही सुचत नाही. त्यांनी एडस्ची जी लक्षणं सांगितली ती सगळी मला जाणवायला लागली आहेत. माझा घाम वाढलाय, माझं वजन नक्की कमी झालंय. मला जुलाब व्हायला लागले आहेत. मी निरोध वापरायला पाहिजे होता. चुकलंच.

*निरोध न वापरता दोन पुरुषांनी गुद मैथुन केला, आणि त्यातल्या एका पुरुषाला जर गुप्तरोगाची किंवा एच. आय. व्ही. ची लागण असेल तर दुस-या पुरुषाला त्याची लागण होण्याची शक्यता खूप असते. त्यामुळे समलिंगी पुरुषांनी गुद मैथुन*

*निरोध वापरूनच केला पाहिजे. दुर्दैवाने फार कमी जण निरोध वापरतात आणि त्याचे परिणाम त्यांना आणि इतरांना भोगावे लागतात.*

हा आठवडा जाता जात नाही. मी कामात गुंतून घेतो. जेवढा विचार करायला कमी वेळ मिळेल तेवढं चांगलं. या टेन्शनमुळे दररोज दारू पितो. यांनी खरं लगेच रिझल्ट द्यायला पाहिजे. मला असं हे अधांतरी रहाणं सहन होत नाही.

आठवडा कसा गेला माझं मलाच ठाऊक. आज भीत भीत मी रिझल्ट आणायला गेलो. दगडूशेठला जाऊन मग दवाखान्यात गेलो. जिन्यापाशी आलो तर वाटायला लागलं की रिझल्ट घेऊच नये. जे व्हायचं ते होणारच आहे. मी परत वळलो. रस्त्यावर आलो तर परत नाना विचार माझ्या मनात यायला लागले,  मला माहीत होतं मला चैन पडणार नाही. सारखा तो भुंगा माझ्या मनात राहील. त्यापेक्षा एकदा सोक्षमोक्ष काय तो लावून टाकू. निदान असं अधांतरी तरी रहायला नको. मला लागण झाली असेल तर माझ्यापासून अजून कोणाला व्हायला नको. मी परत वळलो. मला जिना चढवत नव्हता. पाय कापत होते. आज खूप गर्दी होती. मी बराचवेळ बाकड्यावर इतरांकडे पहात बसलो होतो. यांतल्या कितींना झाला असेल? त्यांना काय वाटत असेल? माझ्या आणि त्यांच्या भावना एकसारख्याच असतील का? कळत-नकळत मी नखं खात बसलो होतो. हल्ली ही एक मला सवय लागलीय. रक्त येऊन वेदना होईपर्यंत नखं खायची.

मला आत बोलावलं. मी बिल्ला दाखवला. काऊन्सेलर बाईंनी मला सांगितलं, की मला एच. आय. व्ही. ची लागण झालेली नाही. एका सेकंदात सगळं जग बदललं. मन एकदम हलकं झालं. त्या बाई पुढे काय बोलतात याकडे माझ लक्षच नव्हतं. त्यांना ते कळलं असावं. त्या दोन मिनिटं शांत

बसल्या. मी जरा भानावर आल्यावर त्यांनी परत बोलायला सुरुवात केली. त्यांनी परत कंडोमचा पाढा वाचला. मला चार-पाच कंडोम दिले. मला नरेनला भेटायला पाहिजे. त्याचा मला खूप उपयोग झाला.

नरेनला आज संध्याकाळी भेटलो. सांगितलं की माझ्या मित्रानं गाडीखान्यातून औषध घेतलं. सगळं ठीक झालंय. त्यानी तुला धन्यवाद सांगितलेत. मला एकदा तुझ्याबरोबर तुझ्या ऑफिसमध्ये यायचंय आणि माझे खरं नाव रोहित आहे. पण मी माझं नाव ऑफिसमध्ये सांगणार नाही. तिथे मला तू राहूल म्हणूनच हाक मार.

माझा आता नरेनवर विश्वास बसलाय. तो आता माझा आधार झालाय. त्याची मला मदत झाली. मी मागूनसुद्धा त्यानं माझ्याबरोबर सेक्स केला नाही, म्हणून मला त्याच्याबद्दल आदर वाटतो. त्यांच्या मदतीने माझा त्याच्याबद्दलचा मत्सर धुवून गेला.

*आपण किती मतलबी असतो ना?*

आज मी नरेनबरोबर ऑफिसवर गेलो. कोणी मला ओळखेल की काय याची मला खूप भीती वाटत होती. माझी तिथल्या एका बॉफ्रेंडरशी नरेननी ओळख करुन दिली. त्याचं नावं राजेश. माझी ओळख करून देऊन नरेन निघून गेला. मला काय बोलावं हे सुचत नव्हतं. मी त्याची नजर चुकवत होतो. तोपण 'गे' आहे. मी त्याला सांगितलं, की मी बायसेक्शुअल आहे.

> *सुरुवातीला मी समलिंगी आहे हे सांगायची खूप लाज वाटत होती. त्यामुळे मी बायसेक्शुअल आहे असं सांगत होतो. म्हणजे मी इतका 'वाईट' नाही हे सांगायचा एक हेतू आणि पुढे लग्न केलं तर ती फसवणूक नाही हे सांगायचा दुसरा हेतू.*

बाकी मी माझ्याबद्दल काही बोललो नाही. त्याला त्याची माहिती विचारली. त्याने त्याचे अनुभव अगदी मोकळेपणाने सांगितले. मी खोदून खोदून विचारत होतो. त्याचे अनुभव आणि विचार माझ्या अनुभवांशी आणि विचारांशी ताडत होतो. राजेशचं खूप कौतुक वाटतंय. केवढा धाडसी माणूस आहे. मला असं उघडपणे बोलायचं धाडस कधीही येणार नाही.

*हे धाडस मला पाच वर्षात येणार आहे हे मला तेव्हा माहीत नव्हतं. आता मी समलिंगी आहे हे मोकळेपणाने सांगतो. हे सांगण्यासाठी कोणीही माझ्यावर सक्ती केलेली नाही. पण आता मलाच 'क्लोझेट' (आपली लैंगिकता लोकांपासून लपवणं) मध्ये राहून गुदमरायला होतं. जगण्यासाठी जसं श्वास घेणं आवश्यक आहे तसंच मला आता आऊट' असणं गरजेचं आहे.*

मला काल खूप छान झोप लागली. मागची कित्येक वर्ष अशी झोप लागली नव्हती. मी फोन करून राजेशची परतः अपॉइन्टमेंट घेतलीय. आम्ही शनिवारी भेटणार आहोत. मी एक प्रश्नांची यादी तयार करायला घेतलीय. त्याला माझ्यासाठी भरपूर वेळ बाजूला काढायला सांगितलाय.

मी आज त्याला भेटलो. दोन तास बोललो. मला आज खूप छान वाटतंय. मन शांत झालंय.

राजेशला माझं खरं नाव सांगितलं. त्याने मला ऑफिसच्या लायब्ररीतली काही पुस्तकं दाखवली. मी वेळ होईल तसा ऑफिसमध्ये जाऊन ती वाचायला लागलो आहे. मला नवीन माहिती मिळतीये. त्यातली काही झेरॉक्स करून घेतोय. काही लिहून घेतोय.

आज राजेशनी एका सायकियाट्रीस्टची माझी गाठ घालून दिली. त्यांच्याशी मी बोललो. ते खूप चांगले आहेत. उदारमतवादी आहेत. त्यांनी

मला माझ्यात  काही दोष नाही असं सांगितलं. मला असे डॉक्टर जर अगोदर भेटले असते तर  माझा किती त्रास वाचला असता.

....

सध्या 'फायर'बद्दल वादळ उठलंय. मी, नरेन आणि आमिशानी तो सिनेमा  लागल्या लागल्या पाहिला. सनातनी लोकांनी आरडाओरडा केला, थेटरची  तोडफोड केली त्यामुळे तो सिनेमा आता चित्रपटगृहातून काढून टाकलाय.

काल काका आले होते. 'फायर'चा विषय निघाला. 'हे असले हिडीस सिनेमे सेन्सॉर कसं काय पास करतं म्हणून म्हणाला. मला त्याच्याशी वाद  घालायचा होता, पण अजून धीर होत नाही. बाबांना त्याचं म्हणणं पटत होतं. पण माझ्यामुळे त्यांना खूप अस्वस्थही होत होतं. आईने लगेच विषय बदलला.

कधीही, कुठल्याही मुद्यावर एकत्र न येणारे हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन सनातनी लोकांचं या विषयाबद्दल एकमत. मराठी, उर्दू वर्तमानपत्रात 'फायर विषयी वाट्टेल ते लिहून आलंय. या सगळ्यांचं मत सारखं. समलैंगिकता  आपल्याकडे नव्हती, ती पाश्चात्त्य संस्कृतीतून आली. या संबंधातून संतती होत नाही म्हणून हे संबंध गैर आहेत. आपल्यासमोर याच्यापेक्षा जास्त महत्त्वाचे प्रश्न आहेत, आत्ता हा मुद्दा उपस्थित करायची काहीही आवश्यकता नाही. काही इंग्रजी वर्तमानपत्रांनी मात्र उदारमतवादी दृष्टिकोन घेतला.

मला ट्रस्टमधली पुस्तकं वाचून माहिती झालीय, की हे आवाज उठवणारे आहेत त्यांना या विषयातली काहीही माहिती नाही. ते फक्त या विषयाचे राजकारण करून प्रसिद्धी मिळवतायत.

त्या सिनेमात दोन बायका एकमेकींबरोबर सेक्स करतात पण तो सिनेमा लेस्बियानिझमबद्दल नाही. त्यात पुरूषांपासून त्यांना शारीरिक सुख मिळत नाही म्हणून त्या एकमेकींशी संबंध ठेवतात. लेसबियन बायका भावनिक आणि शारीरिकदृष्ट्या एकमेकींवर प्रेम करतात, त्यांना पुरूषांची जरूर नसते. नंतर नरेननी मला एक चार्ट काढून दाखवला.

**समलिंगी संबंध -**

L **होमोसेक्शुअल्स**- मानसिकदृष्टया समलिंगी असणारे. ज्यांना आपल्याच लिंगाच्या व्यक्तींबद्दल भावनिक आणि शारीरिक आकर्षण असते.

L **बिहेविअरली हेटेरोसेक्शुअल** - या समलिंगी व्यक्ती, भिन्नलिंगी "व्यक्तींशी लैंगिक संबंध ठेवतात. ते समलिंगी आहेत असं कुणाला सांगत नाहीत. उदा. काही समलिंगी व्यक्ती ज्या समाजाला, घरच्यांच्या जाचाला, दबावाला बळी पडून लग्न करतात. यातले काही बाहेर आपल्या लिंगाच्या व्यक्तीशी लैंगिक संबंध ठेवतात.

L **बायसेक्शुअल्स** - मानसिकदृष्टया उभयलिंगी. ज्यांना काही पुरुष आणि काही बायका भावनिक आणि शारीरिकदृष्ट्या आवडतात.

L **बिहेविअरली होमोसेक्शुअल** - भिन्नलिंगी व्यक्ती न मिळाल्याने आपल्याच लिंगाच्या व्यक्तींशी लैंगिक जवळीक साधणारे. उदा. काही ट्रक ड्रायव्हर आणि क्लिनरच्या जोड्या, काही कैदी. याचा अर्थ या व्यक्ती समलिंगी आहेत असं नाही. ती एक तात्पुरती तडजोड असू शकते. -

L **एक्सपेरीमेंटल सेक्स** - वयात आल्यावर काही मुलं-मुली आपल्याच लिंगाच्या मित्र-मैत्रिणींबरोबर सेक्स करतात. हस्त मैथुन, मुख मैथून इत्यादी. ही एक्सपेरीमेंटल स्टेज असते. याचा अर्थ ते समलिंगी आहेत असं नाही. ही ट्रान्झीशनल फेज असू शकते.

*समाजात एक समज आहे, की समलैंगिक संभोगाची चटक लागू शकते. हा पूर्णपणे चुकीचा समज आहे. अशी अनेक मुलंमुली आहेत (काही माझे मित्र आहेत, की ज्यांचे कॉलेज मध्ये समलिंगी संबंध झाले. त्यातून त्यांना आनंद मिळाला. पण ते भिन्नलिंगी आहेत आणि मोठे झाल्यावर त्यांनी फक्त भिन्नलिंगी संबंध ठेवले त्यांना जर समलैंगिकतेची चटक लागली असती तर त्यांनी अजूनही समलिंगी संबंध ठेवले असते.*

समलैंगिकता निश्चितपणे पाश्चात्त्य संस्कृतीतून आलेली नाही. मला तर मी कोण आहे हे कळतही नव्हतं. मला या ओढीला काय नाव आहे हे माहीतही नव्हतं. समलैंगिकता आपल्याकडे नव्हती तर त्याचा उल्लेख कामसूत्रात, मनुस्मृतीत का आहे?

*मला खूप मुलं विचारतात की सेक्स हे संतती मिळवण्यासाठी आहे म्हणून समलिंगी सेक्स चुकीचे आहे का?*

*आपण सेक्स फक्त संतती मिळवण्यासाठीच करतो का? सेक्स आनंद देण्यासाठी, घेण्यासाठी, आपलं प्रेम, आपुलकी व्यक्त करायचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. फक्त संततीसाठी सेक्स केला असता तर भिन्नलिंगी जोडप्यांनी हस्त मैथुन, मुख मैथुन, गुद मैथुन केला नसता. कुटुंबनियोजनाची विविध साधनं लागली नसती.*

*त्याच्यापेक्षा आपल्यासमोर जास्ती मोठे प्रश्न आहेत. यावर मी असे म्हणेन, की काही तरुण मुलंमुली आपण समलिंगी आहोत आणि हा समाज आपल्याला स्वीकारणार नाही म्हणून आत्महत्या करतात, काही जणांवर त्यांच्या लैंगिकतेमुळे*

*अत्याचार होतात, काहींच्या नोक-या जातात, काहींना घरातून बाहेर काढलं जातं, काहींना रहायला घर कोणी देत नाही, मुलं दत्तक घेता येत नाहीत, हे प्रश्न मोठे नाहीत का? तुम्हाला नसतील कारण तुमच्या घरचं कोणी समलिंगी नाही अशी तुमची धारणा आहे, पण माझ्यासारखा जो हे आयुष्य जगतो त्याला हे सगळे जीवन - मरणाचे प्रश्न आहेत.*

....

आज ट्रस्टने एक फिल्म दाखवली. 'गेट रीयल' नावाची. अमेरिकन फिल्म आहे. मला त्यातले काही डायलॉग कळले नाहीत. पण न कळण्यासारखं काही नव्हतं. खूप सुंदर सिनेमा आहे. त्यात दोन मुलांची लव्ह स्टोरी आहे. माझ्या डोळ्यांत पाणी आलं. मला ती परत बघायचीय. आपल्याकडे असले सिनेमे का निघत नाहीत? माझ्यासारख्यांना किती आधार मिळेल.

पुस्तक वाचून जेवढा इम्पॅक्ट होत नाही तेवढा सिनेमाने होतो हे मला पहिल्यांदा अनुभवायला मिळालं. याच्याविरुद्ध होमोफोबीक (समलिंगी द्वेष्टे) सिनेमे आणि साहित्य समलैंगिक लोकांबद्दल द्वेष, गैरसमज, अज्ञान पसरवतात.

मला पहिल्यांदा एक नवीन जग पहायला मिळालं होतं, जे अंधारलेलं नाही. आत्तापर्यंत समलैंगिक लोक फार नसतात, भारतात तर जवळपास नसतातच असं सारखं मी वाचत आलो होतो. इथे एकदम ऐंशी मुलं एकत्र पाहून माझं मनोबळ वाढलं. मी काही एकटाच नाही. अनेकजण माझ्यासारखे आहेत. त्यांना नुसतं एकत्र बघून मला सगळ्यांना मिठ्या माराव्याशा वाटत होत्या.

*लोकांच्या अवतीभोवती आमच्यासारखे अनेक असतात. हे सावलीचे विश्व असल्यामुळे लोकांना आम्ही दिसत नाही. जगात सरासरी  तीन टक्के पुरुष आणि एक टक्का स्त्री समलिंगी असतात. म्हणजे आपली लोकसंख्या शंभर कोटी धरली तर आपल्यातले चार कोटी लोक समलिंगी आहेत. उभयलिंगी लोकांची टक्केवारी यात धरलेली नाही.*

मला आता काम करायला हुरूप आला आहे. घरी भांडणं बंद झाली आहेत. कारण आता ते काय बोलतात हे मी या कानाने ऐकतो आणि त्या कानाने सोडून देतो. माझा मोकळा वेळ हा ट्रस्टमध्ये जाऊन वाचण्यात जातो. तिथल्या मुलांशी बोलण्यात जातो. माझ्यात काही फरक पडेल ही आशा आता घरच्यांची संपली आहे. आशा धरतो, की ते आता मला माझं आयुष्य जगू देतील. मला स्वीकारलं तर चांगलंच आहे. पण ते मला इतक्यात तरी अवघड वाटते.

मला नवीन मित्र मिळाले आहेत. माझी त्यांची ओळख ट्रस्टमध्ये झाली. साहिलचं लग्न झालं आहे, ब्रायन माझ्याच वयाचा आहे. शेखर पन्नाशीचा आहे. शर्मिला तिशीची आहे. आमिशा अठ्ठावनची आहे. प्रतीक एकोणीसचा आहे. हरभजन पंचविशीचा आहे. आज आम्ही मुलं (मुली नव्हत्या) संध्याकाळी जेवायला गेलो. खूप मजा आली, आम्हाला सर्व्ह करणारा वेटर दिसायला खूप सुंदर होता. आमचं जेवणात लक्ष नव्हतं. सगळ्यांचं लक्ष त्याच्याकडे. आम्ही त्याला वीस टक्के टिप दिली. पुढच्या वेळी इथेच जेवायला यायचं असं ठरलं. कधी एकदा सगळे परत भेटतो असं झालंय. .

शेखरला एच. आय. व्ही. ची लागण आहे हे त्यानं मला आज़ सांगितलं. मी खूप अस्वस्थ झालो आहे.

*कळल्यावर सुरुवातीला त्याच्या जवळ बसायची भीती वाटायची. त्यांनी माझं एच. आय. व्ही/एडस् वर सेन्सिटायझेशन केलं. आपण फक्त आपल्याच विषयाबद्दल संवेदनशील असतो आणि इतरांच्या विषयी पूर्णपणे इनसेन्सिटीव्ह असतो हे तेव्हा मला लक्षात आलं. नंतर तो माझा चांगला मित्र झाला.*

मी आज पहिल्यांदा 'गे' सपोर्ट मिटींगला गेलो. जरा टेन्स होतो. भीती होती, की कोणी ओळखीचा भेटला तर? पण तसं काही झालं नाही. समलिंगी लोकांना नोकरीत काय काय त्रास होतो ('आऊट' असलेल्यांना) या विषयावर चर्चा होती. नऊजण आले होते. राजेशनी मिटींग कन्डक्ट केली.

अशा सेफ स्पेसेसना आणि मिटींग्जना फारसा प्रतिसाद मिळत नाही ही खरंच एक खेदाची गोष्ट आहे. सिनेमाला ऐंशी जणं आणि इथे नऊच जण. खरंतर अशा स्पेसमध्येच आपण पहिल्यांदा कंफरटेबल होतो. मोकळेपणाने बोलू शकतो. भावना व्यक्त करू शकतो. कोणी नावं ठेवत नाहीत, त्रास देत नाही. पण लोकांना या जागेची किंमत नाही.

मला वेगवेगळे अनुभव ऐकायला मिळाले. सौरभच्या बॉसला कुणाकडून कळलं की तो 'गे' आहे. त्याची नोकरी गेली. सुजाताने कंपनीत ती 'गे' आहे असं उघड सांगितलं. ती एका सॉफ्टवेअर कंपनीत प्रोग्रॅमर आहे. तिची नोकरी गेली नाही कारण तिची कंपनी उदारमतवादी आहे. पण तिचे सहकारी तिला सारखे त्रास देतात, नावं ठेवतात. बोलताना तिच्या डोळ्यांत पाणी आलं.

युवराज म्हणून एक पुरुष वेश्या आहे. त्याने त्याचे अनुभव सांगितले. मला त्याची भीती वाटते. तो खूप बायकी आहे. साडी घालून आला होता. - मेकअप केला होता. मला पहिल्यांदा तो बाई आहे असंच वाटलं होतं. कळलं

की  तो मुलगा आहे. मला खूप अस्वस्थ झालं. मी त्याच्यापासून जितक्या दूर जाऊन  बसता येईल तितका बसलो.

मी आता ट्रस्टमध्ये व्हॉलंटीयर म्हणून काम करतो. राजेशला मदत करतो. खुर्च्या लावायला, चहा द्यायला, मिटींगचा अजेंडा छापायला. जी काही छोटी मोठी मदत होईल ती. त्याने माझा आत्मविश्वास वाढायला लागला आहे. आपल्या कार्यात आपला पण हात आहे याचं खूप समाधान मिळतं.

*मी माझ्या समाजाच्या बहुसंख्य व्यक्तींकडे बघतो (त्यातले काही माझे मित्र आहेत) आणि नैराश्य येतं. यांना फक्त मजा मारायला  पाहिजे. यांना 'गे' राईट्सची भाषा येते पण त्यांना त्याच्यासाठी काही किंमत मोजायची तयारी नाही. सगळं फुकट हवं आहे. राजेश नेहमी म्हणतो फुकट मिळालं तर आपली पर्सनल ग्रोथ कशी होणार?*

मला युवराजला वारंवार बघून आणि भेटून त्याची सवय झालीय. माझी अस्वस्थता जवळपास गेली आहे. आता मी त्याला हाय बाय करतो. त्याला साडीत बघितला तर मला अस्वस्थ होत नाही. त्याचा नाटकीपणा सोडला तर स्वभावाने चारचौघांसारखाच आहे. काल तो शर्ट-पँटमध्ये आला तर मी त्याला  ओळखलंच नाही. त्यानं ओळख दिली तेव्हा कळलं.

साहिल जरा चंट आहे. मला त्याच्यापासून जरा जपूनच राहिलं पाहिजे. आज मला हरभजन म्हणाला, की साहिल त्याला एका मुलीशी लग्न करण्याचा आग्रह करत आहे.

*साहिलला हे सुचवण्याचा काय अधिकार होता हे मला कळलं नाही. त्याला समाजात मिळालेली मान्यता महत्त्वाची होती? का फॅमिलीची सेक्युरिटी महत्त्वाची वाटत होती? का मी यात*

*अडकलोय तर तूही अडक असा हेतू होता? का कुठेतरी गिल्ट कॉम्प्लेक्स होता? म्हणून इतरांना तीच चूक करण्यासाठी प्रवृत्त करत होता?*

आज आम्ही सगळे पिक्चरला गेलो होतो. 'फिलँडेलफिया'. सगळ्यांना सिनेमा आवडला. ब्रायन एक नवीन मुलाला घेऊन आला होता. त्याचं नाव  आठवत नाही. मुस्लिम आहे. खूप शांत आहे. जास्त काही बोलत नाही.

*मला नावसुद्धा तेव्हा लक्षात राहिलं नाही. इफन. आणि शांत म्हणे !*

*****

# विवाह

मी सेलफोन घेतला आहे. बरं पडतं. घरच्यांचा उपद्रव नाही. कोणाचा फोन आला? कोण आहे तो? आज नरेनचा वाढदिवस होता. संध्याकाळी आम्ही सगळ्यांनी ट्रस्टमध्ये केक कापला. त्याला बर्थडे बम्पस् दिल्या. मी त्याला एक पार्करचा पेनसेट दिला.

शेखर मागचा आठवडा खूप आजारी आहे. त्याला कामावर जाता येत नाही. खूप विकनेस आलाय. मी नरेन बरोबर त्याच्याकडे गेलो होतो. सारखे जुलाब चालू आहेत. त्याच्या औषधांसाठी आम्ही सगळ्यांनी वर्गणी गोळा केली. शेखरला दिली. मला. त्याच्याकडे जाववत नाही. त्रास होतो. मला असं कोणी आजारी असलेलं बघवत नाही.

आज मी इफनला परत भेटलो. तो सॉफ्टवेअर इंजिनीयर आहे. बंगलोरवरून आलाय. रुममेट्स बरोबर रहातो. त्याने माझा सेल नंबर ब्रायनकडून घेतला. मला कॉफी प्यायला बोलावलं. आम्ही बालगंधर्वच्या कॅन्टीनमध्ये भेटलो. बराच वेळ बोलत होतो. मिसळपाव खाल्ला. ती आमची एकच आवड जुळत होती. बाकी दोघांचा स्वभाव (अर्थात एका भेटीत हे सांगता येत नाही) खूप वेगळा, त्याच्या सिगारेट पिण्याचा मला त्रास झाला. मी त्याला तसं सांगितलं. तो म्हणाला आतापासनं मी बाजूला जाऊन फुकून येईन.

आज इर्फान आणि मी सिनेमाला गेलो होतो. 'अॅज गुड अॅज इट गेटस्'. इर्फानचा चॉईस. मला इतरांना पण बोलवायचं होतं. पण त्याला इच्छा नव्हती. दोघांना सिनेमा आवडला. मग भेळ आणि पाणीपुरी खाल्ली. नंतर ओंकारेश्वरच्या पाय-यांवर गप्पा मारत बसलो. एकदम लक्षात आलं की बारा वाजून गेलेत.

*दोन एक तास बोललो. काय ते मात्र अजिबात आठवत नाही.*

काल आम्ही एका पुस्तकाच्या प्रदर्शनाला गेलो होतो. त्यानं एक कॉम्प्यूटरचं पुस्तक घेतलं. संध्याकाळी गुडलकमध्ये बसलो. त्यानी मला इनडायरेक्टली माझा कोणी बॉयफ्रेंड आहे का हे विचारलं. मी नाही म्हणालो.

इफन दिसायला फार खास नाही. सावळा, नाजूक, लालबुंद ओठ. केसांच्या मधून पाडलेला भांग, टपोरे डोळे. मोत्यासारखे दात. हनुवटीवर मध्यभागी एक बारीक तीळ. मध्यम बांध्याचा. नजर वेधून घेईल अशी त्याची बॉडी नाही.

हल्ली आमचा दररोज एक फोन होतो. तो भयंकर बडबड करतो. सारखी चबरं-चबर चालते. दर एक दिवसाआड मी त्याला भेटतो. कधी वाडेश्वरला, कधी बरीस्तात. मला बरीस्ता परवडत नाही. त्याला कसं सांगावं कळेना. आज मी हिय्या करून त्याला सांगितलं, की आपण जरा कमी महागड्या ठिकाणी बसत जाऊ. मला भीती वाटत होती, की त्याला राग येईल, पण नाही. आम्ही दोघं आपआपली बिलं भरतो.

इर्फानला सिगारेट ओढायची वाईट सवय आहे. सारखी त्याला फुकायला लागते. मी बरोबर असलो, की तो बाजूला जाऊन फुकून येतो. मला तो वास सहन होत नाही.

मी त्याला माझ्याबद्दल सांगितलं. हळूहळू मला त्याच्याबद्दल जवळीक वाटू लागली आहे. त्याच्या घरचे खूप सनातनी आहेत. त्यांना त्याच्या लैंगिकतेबद्दल काहीही माहिती नाही. तो त्याच्या घरच्यांबद्दल बोलायचं टाळतो. मी जास्त आग्रह करत नाही. त्याला इच्छा होईल तेव्हा बोलेल. तो त्याच्या सेक्शुॲलिटीबद्दल अगदी मोकळेपणाने बोलतो. इर्फानला त्याच्या लैंगिकतेचा सुरुवातीला खूप त्रास झाला. आता ऑलमोस्ट ओके आहे.

*कुराणात समलैंगिकतेबद्दल वाईट लिहिलं आहे. खूप ख्रिश्चन मुलांनासुद्धा असा त्रास होतो. बायबलमध्येसुद्धा समलैंगिकतेबद्दल वाईट लिहिलं आहे. इफनला त्याच्या लैंगिकतेचा आणि त्याच्या धर्माच्या दृष्टिकोनाच्या विरोधाभासाचा त्रास व्हायचा. अजूनही होतो. पण आता खूप कमी प्रमाणात. मी त्याला अनेकदा सांगितलं, की पुरुषाचा सहवास ही त्याची मानसिक आणि शारीरिक गरज आहे. त्याचा आणि देवाचा काही संबंध नाही. तो श्रद्धाळूही असू शकतो आणि त्याच वेळी समलैंगिकही असू शकतो. त्याला हे पटतं पण इतक्या वर्षाचं ब्रेनवॉशिंग एका दिवसात जाणार नाही.*

आमचे स्वभाव जरी वेगळे असले तरी आम्हा दोघांना एकमेकांबद्दल ओढ आहे. मला त्याच्याबरोबर सेक्स करायची इच्छा होते, पण मला घाई करायची नाही. त्याला माझी नखं खायची सवय अजिबात आवडत नाही. मला हळूहळू ती सवय मोडावी लागणार. अवघड आहे.

*अशा क्षुल्लक आणि काही इतर गंभीर गोष्टींवरून आमची भांडणं पण झाली. सुदैवाने या भांडणाने कधीही रौद्र रूप घेतलं नाही. एका हद्दीनंतर आम्ही दोघेही मागे सरायचो. हे फिसकटलं तर परत असा जोडीदार मिळायचा नाही ही चिंता दोघांच्या मनात कायम असायची.*

काल आम्ही सगळे शेखरला भेटायला गेलो होतो. त्याला आता बरं वाटतंय. नंतर बागेत गप्पा मारत बसलो. प्रतीक स्वतः ॲक्टीव्ह आहे असं सांगतो. त्याला पॅसिव्ह असलेली मुलं खालच्या दर्जाची वाटतात. त्याचा हा होमोफोबीया लवकर जाईल अशी आशा धरतो. प्रतीकला काऊन्सेलींगची जरूर आहे. त्याला शहाणपण कधी येणार?

आज इर्फान आणि मी एक जीन्सची जाहिरात बघायला गेलो होतो. नरेनंच रेकमेनडेशन. आम्ही सिंबी (सिम्बायोसीस) च्या चढावर गेलो. उतारावरून खाली बी. एम. सी. सी. कडे येताना उजव्या बाजूला आहे ती. भली मोठी जाहिरात आहे. चार मुलं जीन्स घातलेली. वरती उघडी. सुंदर आहेत. आम्ही दोघं त्यांच्याकडे कितीतरी वेळ टक लावून बघत होतो. या उतारावर नक्की अपघात वाढणार. मी त्याला घरी सोडल्यावर, कोणी बघत नाही हे पाहून त्यानं मला हळूच किस केलं. मला त्याला सोडवत नव्हतं, पण तो लगेच घरात गेला.

मला काल प्रमोशन मिळालं. मी इर्फानला संध्याकाळी पीक-अप केलं. त्याला घेऊन आज संध्याकाळी चांदणी चौकात जेवायला गेलो. तिथे आम्ही  पिली. (फार नाही दोनच पेग) बिलं आज त्यानेच हट्टाने भरलं. मग आम्ही रात्री दूर भटकायला गेलो. गार वारा सुटला होता. इर्फानला गाडी चालवायची हुक्की आली. मी मागे बसलो. त्याच्या कमरेभोवती हात टाकले. त्याला घट्ट चिकटून बसलो. त्याच्या केसात माझं नाक खुपसलं. कुठला शांपू लावतो विचारलं पाहिजे. त्याच्या केसांना छान वास येतो. येताना बालेवाडीच्या जवळ एक मोठं पठांर दिसलं तिथे थांबलो. सगळीकडे अंधार होता. माझी छाती धडधड करत होती. मी त्याला जवळ ओढलं आणि किस केलं. आंम्हा दोघांकडे निरोध होते. मी त्याच्या स्वाधीन झालो. घरी पोहोचायला पहाटेचे तीन वाजले. आज मी कामावर गेलो नाही. कालची रात्र परत परत आठवंत बसलोय. अर्थात त्याचे परिणाम मी आज भोगतोय. नाही नाही त्या ठिकाणी लाल मुंग्या चावल्यात.

...

मधूनअधून इरूचं नाव आईसमोर येतंय. तिला काही सांगितलं नाही पण तिला अंदाज आलाय. कधी कधी ती तिरक्या नजरेने माझ्याकडे बघते. मी इरूला मराठी शिकवतोय. माझं हिंदी भयाण आहे. इंग्रजी इतकं

वाईट नाही पण बोलायच्या वेळी शब्द आयत्या वेळी दगा देतात. इरू कधी कधी माझं इंग्रजी ऐकून खो खो हसतो. भडवा.

इरूने काल कमाल केली. त्याने त्याच्या एका कलिगला तो 'गे' आहे म्हणून सांगितलं. अर्जुन नाव त्याचं. मी अस्वस्थ झालो.

'मूर्खा, त्यानं तुझ्या मॅनेजरला सांगितलं तर नोकरी जाईल ना तुझी' - मी.

'अर्जुन खूप समंजस आहे. लिबरल आहे' - इरू.

'त्याचं लग्न झालं आहे का?' - मी.

'नाही' - इरू.

"अरे त्याचं लग्नसुद्धा झालेलं नाही. उगाच त्याला वाटलं की मला कशाला यानं सांगितलं? मी काय त्याच्यासारखा आहे असं वाटलं का याला? बिथरून जाईल ना तो' - मी.

'तो हेटेरोसेक्शुअल असला तरीही खूप सेक्युअर आहे' - इरू.

हेटेरोसेक्शुअल आणि सेक्युअर? ही गोष्ट मी पहिल्यांदाच ऐकतोय. मला इरूचा राग आला. कशाला सांगायचं उगाच? काय नडलंय? चूपचाप आपलं काम करावं ते नाही. उगीच पायावर धोंडा कशाला पाडायचा? अशी गोष्ट दुस-यांना सांगणं म्हणजे माकडाच्या हाती कोलीत देणं.

*एकतर मला इरूच्या नोकरीची काळजी होती. त्याच्या व्यवसायात नोक-या लगेच मिळतात हे जरी खरं असलं तरी - सुद्धा. माझं फारसं शिक्षण नसल्यामुळे मला जॉबची इनसेक्युरीटी खूप होती आणि दुसरं कारण मला त्या वेळेला इरूचा थोडा मत्सरही वाटत होता. आपण कोण आहोत हे दुस-याला सांगणे (विशेषतः ते सांगायचं काहीही कारण*

*नसताना) मला स्वतःला शक्य नव्हतं. ते धाडस त्याने केलं याचा मत्सर होता.*

*मला खूप लोक विचारतात तुम्हीहुन कशाला तुमच्या लैंगिकतेची जाहिरात करता? मी अस सांगतो, की तुम्ही अनेक डायरेक्ट / इनडायरेक्ट मार्गाने तुमच्या भिन्नलैंगिकतेची जाहिरात करता, तुमच्या लग्नपद्धतीचा, कुटुंबसंस्थेचा तुम्हाला अभिमान आहे ना? मग आम्ही का अंधारात रहायचं? आमची लैंगिकता का लपवून ठेवायची? मला वाटतं लोकांना या गोष्टीच्या सामोरी जायची तयारी नाही. दृष्टिआड सृष्टी. आपल्याला त्रास नको म्हणून तर हे धोरण नसेल? आमच्या लैंगिकतेबद्दल आम्ही आयुष्यभर शरम बाळगावी अशी तुमची का इच्छा आहे? शेवटी आमची ही धडपड कशासाठी? आमचा मुखवटा स्वीकारावा म्हणून नाही. आम्ही जसे आहोत तसं लोकांनी स्वीकारावं म्हणून. कुठल्या माणसाला असं वाटणार नाही? आम्ही काय कोणाचं घोडं मारलं आहे? आणि आपण कोण आहोत हे जर सांगितलं नाही तर लोकांनी आमच्याशी संवाद कसा साधायचा? आमचे प्रश्न समजून कसे घ्यायचे?*

*प्रत्येक वेळेला 'आऊट' होणे ही एक मोठी रिस्क आहे हे खरंय. आपल्याला मारहाणसुद्धा होऊ शकते. ही गोष्ट सुरुवातीला तरी समोरचा माणूस जाणून मगच करायची असते. पण समाजात आपल्याला मानाचं स्थान मिळवायचं असेल, हक्क मिळवायचे असतील तर या दिशेने वाटचाल केलीच पाहिजे. त्याला दुसरा पर्याय नाही.*

मला आता इरूच्या धाडसानं खूप कौतुक वाटतंय. मी जर गॅरेजमध्ये असं सांगितलं तर अनर्थ होईल. पण मला कोणाला तरी असं विश्वासात घ्यायला आवडेल आणि त्या व्यक्तीने जर मला स्वीकारलं तर? मला खूप छान वाटेल. आत्तापर्यंत मी एकाही भिन्नलिंगी व्यक्तीला 'आऊट' झालेलो नाही. घरचे, बाबा/ज्योतिषी,... सोडले तर. यातल्या एकानंही मला स्वीकारलेलं नाही. मला नुसतं माझ्या समाजानी स्वीकारणं पुरेसं नाही, मला इतरांनीही स्वीकारावं असं मला वाटतं. असे मित्र, नातेवाईक, शेजारी, सहकारी असावेत असं वाटतं. मला कीव किंवा दया नको आहे.

दिवाळीला मी इरूला टी शर्ट घेतला. त्याने मला जीन्स घेतली. आमच्या नात्याबद्दल मी फक्त शेखर, नरेन आणि हरभजनला सांगितलं. निक्षून सांगितलं, की बाकी कोणापाशी बोलायचं नाही. प्रतीकला संशय आहे. माहिती काढायला बघतो. मी दाद देत नाही. कोणाची नजर लागायला नको. जळतो साला. मी गॅरेजमध्ये मात्र माझी एक गर्लफ्रेंड आहे असं सांगतो. इरूचं वर्णन सांगतो. त्यांना माझ्या गर्लफ्रेंडला एकदा भेटायचयं. ते जरा मुश्कील आहे.

डायरी लिहिणं बंद करणार आहे. इरू माझ्या आयुष्यात आल्यापासून मी आता सगळं त्याच्याशीच बोलतो. डायरीत लिहायची महिने-महिने इच्छाच होत नाही. खरं तर मध्यंतरी ट्रस्टवर जाणंसुद्धा बंद झालं होतं. पण आता मी स्वतःला डिसीप्लीन लावली आहे. आपलं माहेर असं विसरता कामा नाही. व्हॉलंटीयरींग करायचंच. दोन टक्के पगार ट्रस्टला द्यायचा. माझं ते कर्तव्य आहे.

हल्ली इरूच्या प्रोजेक्टचं काम वाढल्यामुळे दररोज भेटता येत नाही. त्याला खूप उशीर होतो. नुसत्या फोनवरच भागवावं लागतं. मला बेचैन होतं.

आज दोन आठवड्यांनी भेटलो. एक आठवडा त्याने सेलफोन बंद करून ठेवला होता. त्याची महत्त्वाची डेडलाईन होती. का कोणास ठाऊक मला त्याचा  राग आला. मला त्याच्या कामाचं महत्त्व माहीत होतं पण तरीही मी त्याच्यावर खट्टू होऊन बसलो. तो वीस मिनिटं उशिरा आला ते भांडणाचं निमित्त केलं. चिडून घरी निघून गेलो.

त्याने अनेकवेळा फोन करायचा प्रयत्न केला. मी सेलफोन बंद ठेवला. होऊ दे त्रास त्याला. मीहून मुळीच फोन करणार नाही.

*मला असं वागायला कारण माझी असुरक्षितता होती. दोन आठवडे तो भेटला नाही म्हणून मला वाटायला लागलं की हा माझ्यापासून दूर तर गेला नाही? तो हातून निसटेल ही भीती होती. या भीतीने मी खूप पझेसीव झालो होतो.*

काल रात्रभर मला झोप नव्हती. आज सेल ऑन केला पण दिवसभर त्याचा फोन आला नाही. मला भीती वाटायला लागली आहे, की माझ्या अशा वागण्यानं त्यानं माझ्याशी नातं तोडलं तर? मी हातचा त्याला गमावून बसेन. प्रत्येक  वेळी फोन वाजला की त्याचा असेल असे वाटत होतं. सकाळी तीन फोन आले. त्याचा आला नाही. दुपारी तीन वाजता त्याचा फोन आला. मला इतका आनंद झाला की काय बोलावं ते सुचेना. त्याच्या टीमबरोबर आज तो पिकनिकला गेलाय. प्रोजेक्ट पूर्ण झाल्याचं त्याच्या टीमचं सेलिब्रेशन. पिकनिक त्याच्या कंपनीने स्पॉन्सर केली. आमच्या नशिबात असं कधी व्हायचं नाही. उद्या वाडेश्वरला भेटायचं ठरलंय.

आज जरा लवकर कामावरून घरी आलो. दोन दिवस दाढी केली नव्हती, ती केली. दोन ठिकाणी कापून घेतलं. नवीन कपडे चढवले. आईला जेवायला मी घरी नाही सांगितलं आणि घरातून पळालो. तो काळी टाईट

पँट आणि काळा टी शर्ट घालून आला होता (मला काय आवडतंय हे त्याला चांगलं ठाऊक आहे). सेक्सी. त्याला पाहिल्याबरोबर त्याला मिठीत घेऊन त्याचे तासभर चुंबन घ्यावं असं वाटत होतं. पण तसं केलं असतं तर वाडेश्वरच काय पूर्ण डेक्कन हादरलं असतं. टेबलाखाली हात धरून बराच वेळ काही न बोलता बसलो. त्याने आठवण करून दिली. आज आमची भेटायची दुसरी ॲनीव्हर्सरी होती. मला असल्या तारखा अजिबात लक्षात रहात नाहीत. याच्या डायरीत सगळ्यांच्या नोंदी. त्याने माझ्यासाठी एक भली मोठी कॅडबरी आणली होती.

आम्ही कात्रज घाटात गेलो. गाडी लावून डोंगरावर चढलो. मी आजूबाजूला जमिनीवर मुंग्या नाहीत ना हे बघून घेतलं. अंधार पडायची वाट पाहिली. आम्ही अधीर झालो होतो...

नंतर मी त्याची आणि त्याने माझी अंडरवेअर घातली. मग तिकडून पलीकडे शिवापूरला गेलो. तिथं जेवलो.

जेवताजेवता म्हणाला त्याला अमेरिकेला जायचा चान्स आला आहे. तीन वर्षांसाठी. मी त्यांचे अभिनंदन करावं का रडावं हेच मला कळेना.

मला अगोदर विचारून इरूने माझ्याबद्दल अर्जुनला सांगितलं. मी जरा अस्वस्थ झालो होतो पण त्याचवेळी इरू आमचं नातं चार लोकांना सांगायला तयार आहे हे जाणून मला खूप छान वाटलं. याचा मला खूप अभिमान वाटतोय. तो या नात्याबद्दल सिरीयस आहे.

तीन दिवस आम्ही सवाई गंधर्वला पडून होतो. सकाळी गॅरेज आणि रात्री जागरणं. मला हिंदुस्थानी क्लासिकल आवडतं. इरूला अजिबात आवडत नाही. माझा सहवास लाभतो म्हणून तो माझ्याबरोबर येतो. रात्री अकरा साडेअकरा वाजता माझ्या मांडीवर डोकं ठेवून झोपून जातो. भैरवी झाली की मी त्याला उठवतो. काल आमच्या शेजारच्या एका बाबाला त्याचं

असं माझ्या कुशीत झोपणं आवडलं नसावं. तो आमच्याकडे सारखं रोखून बघत होता. बघू देत भडव्याला.

इरूने आज माझ्या डोक्यात भलतीच आयडिया घालून दिली. म्हणाला तू स्वत:च गॅरेज का नाही काढत. असा विचार माझ्या स्वप्नात देखील आला नव्हता. पण हळूहळू मला त्याची कल्पना आवडायला लागली आहे. घरच्यांना ही कल्पना बोलून दाखवली. तुला जमणार नाही असं बाबांनी स्पष्ट सांगितलं. लाखाचे बारा हजार करशील. नोकरी कर आणि गप्प बस. आईला सुरुवातीला कल्पना आवडली. पण तिचा भलताच संशयी स्वभाव आहे. इरूने आयडिया सुचवली हे तिला कळल्यावर त्याचा काहीतरी स्वार्थ आहे हे ती डोक्यात घेऊन बसली आहे. आता तिला ती कल्पना आवडत नाही. मी तिला खूप समजावून सांगतोय, की त्याला त्यातून काहीही मिळणार नाही पण तिला ते पटत नाही.

आज मी आणि इरू दापोडीजवळच्या अनाथ आश्रमात गेलो होतो. तिथे अर्धा दिवस होतो. मी आणि इरूनी मुलांना खाऊ दिला. इरूला मुलं खूप आवडतात. मला अजिबात आवडत नाहीत. त्याला मुलांबरोबर खेळताना बघून मात्र माझा वेळ छान गेला. इरू मुलांमध्ये अगदी रमून गेला होता. जशी काय त्याचीच मुलं आहेत. त्याच्या नशिबी मूल नाही ही कळ मला एकदम लागून गेली.

> *त्याला मी एकदा सांगितलं की तुला मुलं आवडतात हे ठीक आहे, पण तुझी लैंगिकता जर इतरांना कळली तर ते त्याचा भलताच अर्थ काढतील. आपल्या बहुसंख्य लोकांना समलैंगिकता आणि पेडोफीलीया यांतला फरक कळत नाही. (पेडोफीलीया म्हणजे एका पुरुषाला किंवा बाईला लहान मुला-मुलीबद्दल वाटणारं भावनिक आणि शारीरिक आकर्षण) एक*

*चुकीचा समज समाजात आहे, की लहान मुला-मुलींना नादी लावणारी त्यांच्याशी चाळा करणारे लोक म्हणजे समलैंगिक लोक, समलैंगिकता आणि पेडोफीलीयाचा काहीही संबंध नाही.*
*Using young girls & boys as sex objects has nothing to do with the perpetrator's Sexual Orientation or Gender Identity.*

इरूने यु. एस.ची संधी नाकारली. त्याला माझ्यापासून दूर रहाणं सहन होत नाही. मी म्हणालो, की अमेरिकेला जायचं असेल तर जा, पण खरं सांगायचं तर तो जाऊ नये अशी माझी स्वार्थी इच्छा होती.

अर्जुनचं लग्न ठरलंय. त्याने इरूला आणि मला जोडीनं लग्नाला यायची पत्रिका दिली आहे. मी ती पत्रिका जपून ठेवली आहे. मि. इफन आणि मि. रोहित. किती सुंदर वाटतंय आज मला. अर्जुनला आम्ही मोठं गिफ्ट देणार आहोत. अर्जुनने आहेर आणू नका असं बजावून सांगितलंय. त्याला मी फोनवरून समजावून सांगितलं, की आमच्या आयुष्यात पहिल्यांदा कोणीतरी नुसतंच स्वीकारलं नाही तर आमच्या नात्याला सुद्धा मान्यता दिली आहे. आम्हाला जोडीने बोलावणारा पहिला तूच आहेस. जोडीने कोणाला आहेर करायची ही पहिलीच वेळ आहे तर नाही म्हणू नकोस. आमच्यासाठी ही फार मोठी गोष्ट आहे. अर्जुन ऐकायला तयार नाही. एकाकडून आहेर घेतला तर सगळ्यांकडून घ्यावा लागेल असं म्हणाला. त्याच्या लग्नाअगोदर मी आणि इरू त्याला आणि अनिताला जेवायला घेऊन जाणार आहोत.

काल मी, इरू, अर्जुन, अनिता आम्रपालीत गेलो होतो. अनिता अर्जुनइतकीच उदारमतवादी आहे. तिला दोन लेसबीयन मैत्रिणी आहेत. ती आम्हाला त्यांची गाठ घालून देणार आहे. ते नाही म्हणत असतानासुद्धा आम्ही बळजबरीने त्यांना गिफ्ट घ्यायला लावलं. मला घरी आल्यावर

सारखं रडू येत होतं. मला डायरीत काय लिहू हेच कळत नाही. माझ्या भावनांना शब्दच नाहीत. मी मागच्या जन्मी खूप पुण्य केलं असलं पाहिजे.

*माझा भिन्नलिंगी लोकांबद्दलचा द्वेष त्या वेळेपासून पूर्णपणे नाहीसा झाला. मला नंतर अनेक भिन्नलिंगी लोक भेटले ज्यांनी मला खूप आधार दिला. त्यातले काही माझे खूप जवळचे मित्र-मैत्रिणी आहेत. काही माझे चांगले सहकारी आहेत. त्यातले काही डॉक्टर्स, काउंन्सेलर्स, सोशल वर्कर्स आहेत. माझ्यावर यांचे अनंत उपकार आहेत. त्याची परतफेड कधीही होऊ शकत नाही.*

मी दुकान काढायचं ठरवलं. सध्या जागा शोधणं चालू आहे. भाड्याने न घेता मी जरा दूर असली तरी स्वत:ची जागा घ्यावी असं इरूनं सुचवलं. मलाही फार मोठी जबाबदारी वाटते. पण तो म्हणतो ते बरोबर आहे. मला आत्ता थोडं जड जाईल पण लॉंग टर्मच्या दृष्टीने आपलं स्वत:चं दुकान असणं फायद्याचं आहे.

काल अर्जुनचं लग्न होतं. आम्ही जोडीने गेलो. त्याने आम्हाला त्याच्या आईबाबांना इन्ट्रोड्यूस करून दिलं. हा इर्फान आणि हा त्याचा बॉयफ्रेंड रोहित. त्याचे आई-वडीलही तितकेच उदारमतवादी आहेत. कमाल आहे. माझ्या आईबाबांना यांची गाठ घालून दिली पाहिजे. पहिल्यांदा मला समाजात मान्यता मिळायला लागली आहे असं वाटायला लागलं आहे. मला खूप अभिमान वाटतोय. माझं आणि इरूचं असंच लग्न झालं तर? मी आज दिवसभर स्वप्नरंजन करत होतो.

*समलिंगी जोडप्यांच्या लग्नाच्या (Legal Partnership) विरोधात भिन्नलिंगी लोक का आहेत मला कळत नाही. आमच्यातल्या खूप मुला - मुलींना लग्नसंस्थेबद्दल आदर आहे. तिचे काही तोटे असले तरी त्याच्यापेक्षा चांगला पर्यायी*

*मार्ग आत्तातरी समोर नाही. त्या नात्याला मान्यता आहे. कायद्याचा आधार आहे. आमच्या जोडप्यांच्या लग्नाला मान्यता मिळाली तर लग्नसंस्था कोलमडून पडेल अशी लोकांना भीती असते. उलट ती लग्नसंस्था अजून बळकट होईल. याच वेळेला भिन्नलिंगी जोडप्यांत (पुरुष आणि स्त्रियांच्यामध्ये) समानतेचं नातं नसतं. स्त्रियांना कमी लेखलं जातं. आमच्या काही मुलांवर याच इनइक्वॅलिटीचा पगडा असतो. जो पॅसीव्ह असतो तो खालच्या दर्जाचा. कारण त्यांना दुसरं रोल मॉडेल पाहायला मिळालेलं नाही. कदाचित, दोन पुरुषांच्या किंवा दोन बायकांच्या समानतेवर आधारलेलं नातं आमच्या आणि भिन्नलिंगी समाजासाठी इक्वॅलिटीचं रोल-मॉडेल होऊ शकेल. नुसता स्टिओटिपीकल रोल-प्लेवर, सेक्सवर दिला जाणारा भर कमी होईल. नात्याचं, भावनेचं महत्त्व वाढेल. पण ते जोपासायला कुंपण पण असलं पाहिजे. त्या शिवाय हे कसं शक्य आहे? हे कुंपण कुठाय? मला इरू जर अगोदर भेटला असता तर कशाला मला इतर ठिकाणी सेक्स शोधायची वेळ आली असती?*

....

इरूच्या बहिणीचं लग्न ठरलंय.

आई मला हळूहळू स्वीकारायला लागली आहे. वर्तमानपत्रात या विषयावर काही छापून आलं की मला आवर्जून सांगते. आज म्हणाली "आपला समाज असा नालायक आहे... त्याला कोण काय करणार?' माझं मन भरून आलं. तिला एवढा त्रास होऊनसुद्धा मला ती मनापासून समजून घ्यायचा प्रयत्न करते आहे. माझ्या बद्दल तिला कळवळा आहे.

अजून आपल्या आईकडे काय मागायचं? मला एकदम तिला मिठी मारावीशी वाटली. पण तसं केलं असतं तर ती संकोचली असती.

मला गॅरेजसाठी चांगली जागा मिळवायला खूप वेळ गेला. पण मिळाली एकदाची. मला लोन मिळवायला त्रास होतोय. बँकेचा ऑफिसर पैसे मागतोय. जे डाऊन पेमेंट लागेल ते बहुतांशी इरू देणार आहे.

आई म्हणाली लोन घेऊ नकोस. इरूकडून तर काहीच घेऊ नकोस. मी लोन घेतलं नाही. आईने डिपॉझिटस् आणि एक गळ्यातलं मोडून पैसे दिले. इरूकडून डाऊन पेमेंट घेतलं म्हणून आई जरा खट्टूच आहे.

आज रजिस्ट्रेशन झालं. इरूची आणि आईची आज ओळख झाली. बाबा आले नाहीत. रजिस्ट्रेशन नंतर आम्ही सगळे जेवायला जाणार असं ठरलं होतं. पण आई इरूला बघून खूप अस्वस्थ झाली. इरूला ते जाणवलं. त्याने काहीतरी काम काढलं आणि निघून गेला. आईचा मला राग आला. माझा या दोघांच्यात कोंडमारा होतो. येताना रस्ताभर आईची 'त्याच्यात काय पाहिलसं' म्हणून पुटपुट चालू होती.

संध्याकाळी मी इरूला जेवायला घेऊन गेलो. त्याने आढेवेढे घेतले. तो नाराज होता. साहजिक आहे. खूप विनवणी केल्यावर राजी झाला. त्याचा जीव माझ्यात किती अडकला आहे, हे मला आता जाणवतंय. मला निदान घरचे तरी होते. इथं तर तो एकटा आहे. त्याच्या विश्वात फक्त मीच आहे. लहान मुलासारखा मला घट्ट मिठी मारून बसला. कोणी पाहील ना पाहील याची काही पर्वा नव्हती. त्याच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या. मला काय बोलावं हेच कळेना. आम्ही दोघंही आज खूप बेचैन होतो.

आज मी इरूला म्हणालो, की आपण एका भाड्याच्या घरात एकत्र राहू. आपल्या घरच्यांच्यापेक्षा आता आपणच एकमेकांचा आधार बनलं

पाहिजे. घरचे आपल्याला समजून घेणार नाहीत. तो म्हणाला, त्याच्या घरच्यांना कळलं तर अनर्थ होईल. मी म्हणालो त्यांना काय कळणार आहे? आणि कळलं तर कळलं. अर्थात मीही आईला कसं सांगणार हा प्रश्नच आहे म्हणा. ती घर डोक्यावर घेईल. तो म्हणाला त्याचा बाप खूप बेकार आहे. त्याला त्याच्या बापाविरुद्ध नाही उभं रहाता येणार. मी जास्ती ताणलं नाही. हळूहळू त्याला माझी कल्पना नक्की पटेल.

बहिणीच्या लग्नासाठी इरू बंगलोरला गेलाय. दोन आठवड्यांसाठी. त्यानं मला निमंत्रण दिलं. पण त्याला मी यावं अशी इच्छा नव्हती. मला त्याचं वाईट वाटलं. त्याच्या आई-वडिलांना भेटायला मला आवडलं असतं. मी गेलो नाही. त्याच्याकडेच बहिणीसाठी प्रेझेंट दिलं. त्याला जीन्स आणि टी शर्ट घेतले. दोन आठवडे कसे जाणार कोण जाणे.

इरू आज परत आला. तो अजून पाच दिवसांनी यायला हवा होता. बहिणीचं लग्न झाल्याझाल्या तो परत आला. आज त्याचा फोन आला. त्याला भेटायला गेलो. काय बोलू आणि किती बोलू असं त्याला झालं होतं. चेहरा आक्रसला होता, डोळ्यांखाली काळं आलं होतं. घरचे आत्ताच त्याच्या लग्नाची बोलणी त्याला न सांगताच करायला लागले आहेत. त्याच्या घरी हुकूमशाही चालते. बाप म्हणतो तसं सगळ्यांनी वागायचं, बाप कमालीचा सनातनी आहे. आईचं तर पायपोसणं केलंय. पाच वेळा नमाज करणं आणि सगळ्यांना अमानुषपणे वागवणं एवढंच त्याच्या बापानं आयुष्यभर केलं. तो लग्न करणार नाही म्हणाला तर बापाने त्याला बेल्टनी फोडून काढलं. तो पाकीट घेऊन तसाच बाहेर पडला. बॅगसुद्धा बरोबर घेतली नाही. खूप खिन्न होता. त्याला मिठीत घेतल्यावर खूप रडला. मग चिडला. बापाला खूप शिव्या दिल्या. पूर्वी त्याच्या बापाला हार्टअ‍ॅटॅक आला होता. म्हणाला, “खूप वाटत होतं की तो मरावा. पण वाचला साला. मी आता परत घरी

जाणारच नाही. माझ्या घरचे माझ्यासाठी मेले. अम्मीसाठी माझा जीव अडकतो.' मी म्हणालो सगळ्यांचे बाप सारखेच.

....

गॅरेज बरं चाललंय. सगळ्यांत पहिलं काम मिळालं ते इरूची गाडी सहिसे करायचं. जबरदस्तीने मला पैसे घ्यायला लावले. इरू काम सुटल्यावर कधी कधी गैरेजमध्ये येतो. ऑफिसमध्ये आज काय झालं ते सांगतो. त्याच्या ऑफिसमध्ये एक छान पोरगा लागलाय. त्याच्याकडे या साल्याचं कायम लक्ष असतं. त्याचं गुणवर्णन चालू असतं. पण आता मला मत्सर किंवा संशय वाटत नाही. उलट लाडात मी म्हणतो तुला तो एवढा आवडतो तर त्याला तुझी दुसरी बायको कर. बोलता बोलता मला कामाला मदत करतो. कधीकधी कंटाळा आला असला तर नुसता सिगारेट फुकत बसतो.

दोन दिवस आमचा फोन झाला नव्हता. कळलं की दोन दिवस त्याच्या रूमवर गोंधळ चालला होता. त्याचा बाप आणि बहीण पुण्याला आले होते. त्यांनी एक मुलगी फिक्स केलीय. याला सांगायला आले. याच्या रूमवर भांडण. बापाने धमकी दिली, की जर त्यानं तिला पसंत केलं नाही तर ऑफिसवर येऊन तमाशा करीन. त्याला खूप मनस्ताप झालाय. त्याचा बाप आणि बहीण आज गेले. त्याची बहीण म्हणजे त्याच्या बापाचा हुबेहूब नमुना.

त्याच्या रूमवर गेलो. त्याचे रूममेट्स होते म्हणून जास्त बोलता येईना. त्याला बाहेर घेऊन गेलो. बागेत हातात हात घालून बसून राहिलो. बाग बंद झाली. मग एका कट्टयावर बसलो. रात्र झाली. भूक लागली नव्हती. केव्हातरी रात्री गस्त घालणा-या पोलिसांनी आम्हाला हाकलून दिलं. त्याला घरी सोडलं. आम्ही एकही शब्द बोललो नव्हतो,

इरू आठवडाभर आजारी होता. दोन दिवस हॉस्पिटलमध्ये होता. मी रात्री झोपायला जात होतो. त्याचे रूममेट्स सकाळी आणि संध्याकाळी येऊन जायचे. त्याच्या मित्रांना त्यानं सांगितलं, की घरी अजिबात कळवायचं नाही. आता बरंय पण खूप विकनेस आहे.

*अशा वेळेला स्वतःच घर असण्याचं महत्त्व खरं कळतं. जिथे आपण आणि आपला जोडीदार, आई नाही, बाबा नाही, कोणी नाही. आमच्यापासून त्यांना त्रास नाही आणि त्यांच्यापासून आम्हाला उपद्रव नाही.*

त्याच्या बापाचे दररोज फोन सुरू झाले आहेत. फोनवरून शिव्या आणि धमक्या, इरूला डिप्रेशन आलंय.

त्याचा बाप परत पुण्याला येऊन गेला. ऑफिसवर जाऊन तमाशा केला. इरूचं बोलणं खूप कमी झालंय. सगळ्याचा वीट आलाय असं बोलतो.

आज इरूनं मला फोन केला. त्याला काहीतरी सिरीयस बोलायचंय. मला धस्स झालं. त्याला आज संध्याकाळी पर्वतीवर भेटलो. वाटेत नाही नाही ते विचार माझ्या मनात येत होते. याने लग्न करायचं ठरवलं तर? दिवसभर मला काही सुचत नव्हतं. डबा खाल्ला नाही. मागे वाघजाईच्या टेकडीवर गेलो.

तो अमेरिकेला जायचा विचार करतो आहे. त्याला माझ्याशी या विषयावर बोलायचं होतं. पण मी काय बोलणार? मला तो जाऊ नये ही फार इच्छा आहे. पण त्याला तिकडे जर स्वातंत्र्य मिळणार असेल तर मी त्याला आडवणं बरोबर होणार नाही. त्याला हे पाऊल उचलायला किती त्रास होत असणार हे मला जाणवतंय. तो ज्या वातावरणात वाढला आहे तिथे तो स्पष्टपणे काहीही सांगू शकणार नाही. त्याच्यात तेवढी ताकद नाही. अशा परिस्थितीत माणूस फार दबून गेलेला असतो. मी समजू शकतो.

मग त्याला पर्याय काय? त्यानं स्वत:चं काही बरंवाईट करून घेऊ नये, ही मनापासून इच्छा. बाकी त्यानं कुठलाही पर्याय उचलला तरी मी सहन करू शकेन. त्यानं लग्न करायचं किंवा अमेरिकेला जायचं आणि तिथे नव्यानं संसार थाटायचा. मी त्याला हे सगळे विचार बोलून दाखवले. मला खूप त्रास होत होता, पण माझा संयम सुटला नाही.

त्याला काय करावं हे सुचत नाहीये. एकीकडे मला सोडायचं नाही आणि दुसरीकडे त्याच्या बापाशी प्रतिकार करणं त्याला जमणार नाही. मी त्याला सांगितलं की त्यानं कुठलाही निर्णय घेतला तरी माझं त्याच्याबद्दलचं प्रेम कमी होणार नाही. 'तू माझी काळजी करू नकोस. I Love You and will always I Love You.' बोलताना माझा आवाज घोगरा झाला होता. घरी आल्यावर मी खूप रडलो. त्यानं, कुठलाही निर्णय घेतला तरी आता जाणवायला लागलंय, की आपल्या आयुष्यातले सर्वांत आनंदाचे आणि सुखाचे दिवस संपले. ते परत येण्याची शक्यता नाही. हळूहळू सगळं हातून सुटत चाललंय आणि ते बघण्यापलीकडे आपल्या हातात काहीही नाही.

कंपनीनं त्याचे पेपर्स फाईल केले. आम्ही हल्ली दररोज भेटतो. एकएक  सेकंद बरोबर काढायचा प्रयत्न करतो. मला खूप डिप्रेशन आलंय पण मी ते  दाखवत नाही. त्याच्या घरच्यांना तो जाणार आहे याची कल्पना नाही. त्यांची फोनवरून कटकट चालूच आहे. तिकडे गेल्यावर तो त्यांना कळवणार  आहे. ग्रीनकार्डबद्दल त्यानं कंपनीकडे चौकशी केलीये. आज आम्ही खरेदीला गेलो होतो. त्याला दोन कोट घेतले. भांडी, मसाले, कपडे. त्यानं मला इंटरनेटवर ई-मेल आयडी उघडून दिलाय. मागचे तीन दिवस चॅट कसे करायचं हे तो मला शिकवतोय. माझी टायपिंगची बोंब आहे.

व्हिसा मिळाला. दिवस हा हा म्हणता जातायत.

परवा पहाटेची त्याची फ्लाईट आहे. आज दिवसभर तो ऑफिसमध्ये बिझी होता. आजच्या रात्रीसाठी त्यानं हॉटेल-रूम बुक केली. त्यानं अगोदर चेक-इन केलं. त्यानं फोन करून मला रूम नंबर कळवला. मी संध्याकाळी गॅरेज बंद केल्यावर हॉटेल-रूमवर गेलो. काय बोलावं हे सुचत नव्हतं. चेकलीस्ट घेऊन बसलो. हे घेतलंस का, ते घेतलंस का? मग आम्ही दोघंही शांत झालो. त्यालाही ऑकवर्ड होत होतं. एकदम म्हणाला, 'मला आंघोळ घाल. आजवर माझी खूप इच्छा होती पण तसा चान्सच मिळाला नाही.'

आम्ही दोघांनी कपडे काढले. मी त्याला आणि मग त्यानं मला आंघोळ घातली. मग सेक्स केला. परत आंघोळी झाल्या. जेवण मागवलं. मी त्याला भरवलं. नंतर कितीतरी वेळ त्याच्या मिठीत पडून होतो. पूर्वीचे दिवस आठवत होतो. त्याच्याही डोक्यात बहुतेक तेच विचार असावेत. झोप यायला लागली तरी जबरदस्तीने मी तिला बाजूला सारत होतो. मला जास्तीत जास्त वेळ जागं रहायचं होतं. पहाटे कधीतरी मला झोप लागली. तो अजून जागाच होता.

त्याच्या वावराने मला जाग आली. आवरलं. परत एकदा सगळं घेतलं की नाही तपासलं. मी कॅमेरा आणला होता. आम्ही एकमेकांचे फोटो काढले. जेवलो. चेकआऊट केलं. मग एशिआड घेऊन मुंबईला आलो. तो अमेरिकेला एकदा तीन महिन्यांसाठी गेला होता त्यामुळे त्याला प्रवासाची काळजी नव्हती. मी महाराष्ट्राच्या बाहेर कधीही न गेल्यामुळे मला खूप टेन्शन आलं होतं. ‘पोहोचल्यावर मला फोन कर, काळजी घे’ हे मी त्याला सारखं सांगत होतो. तो म्हणाला, 'माझ्या अम्मीत आणि तुझ्यात काहीही फरक नाही. दोघंही असाच  माझ्या मागं भुंगा लावतात. त्याला अम्मीची खूप आठवण येत होती. मी म्हणालो दादरवरून घरी फोन कर. तो नाही म्हणाला. 'पल्याड गेल्यावरच फोन करीन.' सहारला गेलो. मी एअरपोर्ट

पहिल्यांदाच बघत होतो. घाणेरडा आहे. पुणे रेल्वे स्टेशन आणि सहार एअरपोर्टमध्ये काहीही फरक नाही.

बाहेरच रात्री दहापर्यंत बॅगांपाशी हातात हात घालून बसून राहिलो. काही बोललो नाही. त्याची निघायची वेळ झाली. त्यानं मला मिठीत घेतलं. किस केलं. आम्ही दोघं रडायला लागलो. आम्हा दोघांना एकमेकांना सोडवत नव्हतं. थोड्या वेळाने आम्ही शांत झालो. सिंगापूर एअरलाइन्सच्या गेटपाशी गेलो. त्याने माझे हात घट्ट धरले. मला परत हुंदका आवरेना. आम्ही परत रडायला लागलो. तो म्हणाला, 'आय लव्ह यू' आणि चट्दिशी वळून आत गेला. फ्लाईट पहाटे दोन वाजता होती. त्याची फ्लाईट सुटेपर्यंत मी तसाच बाहेर बसून राहिलो. मनात काहीही विचार नव्हता. बधिर  सारखा बसलो होतो.

इरूचा आज फोन आला, तो व्यवस्थित पोहोचला. कंपनीने त्याला वन बेडरूमचं अपार्टमेंट दिलं आहे. एका कलीगबरोबर शेअर करतो आहे.

काल हिय्या करून ठरवलं घर आवरायचं. माळा आवरायला घेतला. अनेक महिन्यांत का वर्षांत त्याला हात लावला नव्हता.

...

माझ्या आयुष्यातील ही तीन सर्वात सुंदर वर्ष. इरू बरोबरची. मला या तीन वर्षांत माणूसपण आलं. या आठवणी मला आयुष्यभर पुरतील.

इरू परत येईल का? माहीत नाही. दुसरा इरू माझ्या आयुष्यात येईल का? माहीत नाही. असे दिवस परत येतील का? माहीत नाही... पण मला आशा आहे.

आज ब-याच दिवसांनी ट्रस्टवर गेलो. भरपूर काम आहे.

*****

## बिंदुमाधव खिरे लिखित समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी व द्‌विलींगी विषयांवरील पुस्तके

प्रकाशक - सामपथिक ट्रस्ट, पुणे.

1. इंद्रधनु-समलैंगिकतेचे विविध रंग
2. अंतरंग- सामलिंगी मुला-मुलींच्या आत्मकथा
3. मनचिये गुंती - सामलिंगी मुला-मुलींच्या पालकांच्या आत्मकथा
4. सप्तरंग- ट्रान्सजेंडर व तृतियपंथी व्यक्तींच्या आत्मकथा
5. इंटेरेक्स (द्‌विलिंगी) -एक प्राथमिक ओळख
6. मानवी लैंगिकता - एक प्राथमिक ओळख

'BACK PAGE COVER'

आज मला धन्य वाटतंय की मी आत्महत्या केली नाही पण त्यावेळी मी त्याच्या खूप जवळ गेलो होतो. कशासाठी जगायचं हेच कळत नव्हतं.

माझ्यासारख्या किती जणांनी खरोखरच आत्महत्या केल्या असतील? माहीत नाही. काही चिठ्ठी नाही, काही नाही. काय कारण झालं हेच कळत नाही.

एखाद्या व्यक्तीला आपल्या लैंगिकतेसाठी जीव द्यायची पाळी यावी ही स्थिती कुठलाही समाज कसा काय सहन करू शकतो?

# पार्टनर

